दैनिक
# संध्या
निःपक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

शनिवार, दि. ३० मे २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १५४ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# महाराष्ट्र जगात एआयचे नेतृत्व करेल : मुख्यमंत्री

**मुंबई (दै. संध्या)**

■ 'मुंबई टेक वीक २०२६' चे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन



महाराष्ट्र एआय क्रांतीचे नेतृत्व करण्यासाठी अत्यंत सक्षम स्थितीत आहे. मुंबईची आर्थिक ताकद, तंत्रज्ञान कौशल्य, मजबूत स्टार्टअप परिसंस्था आणि नवतंत्रज्ञान स्वीकारण्याची तयारी यामुळे आगामी काळात महाराष्ट्र केवळ भारतातच नव्हे तर जगात एआयचे नेतृत्व करेल," असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे व्यक्त केला.

मुंबईतील बीकेसी येथे 'मुंबई टेक वीक २०२६' चे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी घेण्यात आलेल्या मुलाखतीत मुख्यमंत्र्यांनी दिलखुलास उत्तरे दिली. या कार्यक्रमाला मुंबईच्या महापौर रितू तावडे, मुंबई मनपा आयुक्त अश्विनी भिडे, महानगर आयुक्त डॉ.संजय मुखर्जी, तसेच प्रशासकीय अधिकारी, उद्योजक, स्टार्टअप संस्थापक, गुंतवणूकदार आणि जागतिक तंत्रज्ञान कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. महाराष्ट्र शासनाने १० हजार कोटी रुपयांची एआय गुंतवणूक, दीड लाख रोजगार निर्मिती, सहा 'सेंटर ऑफ एक्सलन्स' आणि विशेष 'एआय इनोव्हेशन क्षेत्रे' उभारण्याचे उद्दिष्ट निश्चित केले असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, एआय क्षेत्रातील संशोधन आणि नवकल्पनांना चालना देण्यासाठी राज्य सरकार 'कम्प्युट-अ‍ॅज-अ-सर्व्हिस' सुविधा निर्माण करत आहे. त्याद्वारे नवउद्योजक आणि संशोधकांना २ हजार जीपीयू उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. उच्च क्षमतेच्या कम्प्युटिंग सुविधा परवडत नसल्यास नवकल्पना थांबते. त्यामुळे महाराष्ट्र शासन थेट पायाभूत सुविधा उपलब्ध करून देत आहे.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, सरकार फक्त धोरणात्मक चौकट तयार करू शकते; पण खरी स्टार्टअप परिसंस्था संस्थापक आणि उद्योजक घडवतात. डिसेंबर २०२२ मध्ये टेक उद्योजकांच्या संघटनेची संकल्पना प्रथम मांडण्यात आली होती, त्यावेळीच त्यांच्या कामातील ऊर्जा आणि दृष्टी पाहून हा उपक्रम मोठा होईल, असा विश्वास वाटला.

आता प्रत्येक वर्षी अधिकाधिक संस्थापक, गुंतवणूकदार आणि जागतिक कंपन्या महाराष्ट्राशी जोडल्या जात आहेत. सलग तीन वर्षे महाराष्ट्र हा गुंतवणूक आणि स्टार्टअप संख्येनुसार देशातील अग्रगण्य राज्य ठरले आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

देशभरातून आणि विदेशातून मुंबई टेक वीकमध्ये सहभागी झालेल्या स्टार्टअप्स आणि तंत्रज्ञान कंपन्यांना उद्देशून मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्रात गुंतवणुकीचे आवाहन केले आणि ते म्हणाले "तंत्रज्ञान आणि एआय क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी हा सर्वोत्तम काळ आहे आणि महाराष्ट्र ही सर्वोत्तम कार्यभूमी आहे. येथे आधीच सक्षम परिसंस्था तयार झाली आहे. महाराष्ट्रासाठी काम करा, भारतासाठी काम करा आणि जगासाठी नवकल्पना घडवा." राज्य शासन केवळ इनक्युबेशन आणि अ‍ॅक्सेलरेशनपुरते मर्यादित नसून 'फंड ऑफ फंड्स'च्या माध्यमातून गुंतवणूक सहाय्यही देत आहे. शासन भागीदार म्हणून तुमच्यासोबत उभे राहण्यास तयार आहे, असे आश्वासनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

राज्य शासनाच्या विविध विभागांमध्ये एआयच्या वाढत्या वापराची उदाहरणे देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'महा-विस्तार' या शेतकरी अ‍ॅपचा विशेष उल्लेख केला. हे शेतकऱ्यांसाठी एक 'वन स्टॉप सोल्युशन' आहे. भारत एआय परिषदेत केंद्र सरकारने त्याला देशातील सर्वोत्तम शेतकरी उपाय म्हणून गौरविले आहे. आता 'इंडिया-विस्तार' संकल्पना त्याच धर्तीवर विकसित होत आहे. तसेच बांधकाम परवानगी प्रक्रियेत एआय आधारित प्रणालीमुळे पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# मान्सून ७ दिवसांनी केरळात पोहोचेल
## वादळी वाऱ्यांमुळे श्रीलंकेत अडथळा

**नवी दिल्ली (दै. संध्या)**



देशात मान्सूनचे आगमन उशिरा झाले आहे. हवामान विभागाने शुक्रवारी सांगितले की, श्रीलंकेतील कमी दाबाच्या वादळी वाऱ्यांमुळे मान्सून 7 दिवसांनंतरच केरळच्या किनारपट्टीवर पोहोचू शकेल. केरळच्या किनारपट्टीवर मान्सून पोहोचण्याची सामान्य तारीख 1 जून मानली जाते. यापूर्वी हवामान विभागाने 26 मे पर्यंतच मान्सून येण्याचा अंदाज वर्तवला होता. अशा प्रकारे, मागील अंदाजानुसार मान्सून सुमारे 10 दिवसांनंतर देशात दाखल होईल. यावर्षी पाऊसही सामान्यपेक्षा कमी असेल. हवामान विभागाने 29 मे रोजी सांगितले की, यावेळी देशात सरासरी 78 सेंटीमीटर पाऊस होऊ शकतो. 1971-2020 च्या आकडेवारीनुसार, देशात सरासरी 87 सेंटीमीटर पाऊस मानला जातो. यापूर्वी हवामान विभागाने 13 एप्रिल रोजी 80 सेंटीमीटर पावसाचा अंदाज लावला होता. आयएमडीनुसार, जून-जुलैमध्येही उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब, बिहार, ओडिशा, छत्तीसगड, गुजरात आणि आंध्र प्रदेशमध्ये उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. सामान्यतः त्यावेळी तापमान 30-35 अंश सेल्सिअसपर्यंत असते. यावेळी तापमान 3 अंश सेल्सिअसने जास्त राहील. हवामान विभागाने सांगितले की, जूनमध्ये मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंडमध्ये सामान्यपेक्षा कमी पाऊस पडेल. तर महाराष्ट्र, राजस्थान आणि गुजरातच्या काही भागांमध्ये सामान्य पावसाचा अंदाज आहे. हवामान विभागाने सांगितले की, यावर्षी मान्सूनच्या कोर झोनमध्ये कमी पाऊस पडेल. मान्सून कोर झोन हा भारतातील असा प्रदेश आहे जिथे शेती सर्वाधिक मान्सूनच्या पावसावर अवलंबून असते. म्हणजेच, पाऊस चांगला पडला किंवा खराब पडला, तर त्याचा थेट परिणाम पिके, शेतकरी आणि अन्न उत्पादनावर होतो.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

# राखाडीच्या जेवणाने २२ जणांना विषबाधा : मळमळ आणि उलट्यांचा त्रास

**ठाणे (दै. संध्या)**




राज्यात विषारी अन्न खाल्ल्याने अनेकांना विषबाधा झाल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. पुण्याच्या हडपसर येथे देखील विषारी दारू प्यायल्याने तब्बल 15 जणांचा बळी गेल्याची बातमी ताजी असतानाच ठाणे जिल्ह्यातील शहापूर येथे एक धक्कादायक प्रकार घडला आहे. 'राखाडी'चे जेवण खाल्ल्याने 22 लोकांना विषबाधा झाल्याचे समोर आले आहे. या 22 लोकांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. शहापूर तालुक्यातील किन्हवली जवळील शिळ गावात तीन दिवसांपूर्वी मरण पावलेल्या व्यक्तीच्या 'राखाडी' कार्यक्रमात 22 जणांना अन्नातून विषबाधा झाल्याची घटना घडली आहे. या कार्यक्रमासाठी आलेल्या पाहुण्यांसाठी आणि नातेवाईकांसाठी दुपारी जेवण बनवण्यात आले होते. विशेष म्हणजे, जे लोक दुपारी हे अन्न जेवून गेले त्यांना कोणताही त्रास झाला नसून त्यांची प्रकृती पूर्णपणे ठणठणीत आहे. मात्र त्यानंतर जेवलेल्या 22 जणांना या जेवणातून विषबाधा झाली. दुपारी अनेक पाहुण्यांनी जेवण केल्यानंतरही मोठ्या प्रमाणावर अन्न उरले होते. उन्हाच्या तीव्रतेमुळे हे उरलेले अन्न खराब होऊ नये म्हणून ते एका थंड पाण्याच्या बादलीत ठेवण्यात आले होते. अन्न वाया जाऊ नये या हेतूने संध्याकाळी जवळचे नातेवाईक, भावकी आणि शेजाऱ्यांना बोलावून ते उरलेले जेवण देण्यात आले. जेवताना अन्नाची चव बदलल्याची किंवा ते खराब झाल्याची कोणतीही तक्रार कुणीच केली नाही, त्यामुळे अन्न दूषित झाल्याचा कुणालाही साधा संशयदेखील आला नाही. जेवण झाल्यानंतर सुरुवातीला कुणालाही त्रास झाला नाही. मात्र थोड्याच वेळात अनेकांना अचानक मळमळ, उलट्या, ताप आणि जुलाबाचा त्रास सुरू झाल्याने सर्वत्र एकच घबराट पसरली. एकूण 22 जणांना या अन्नातून विषबाधा झाल्याचे समोर आल्यावर, सर्वांना तातडीने शहापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.



# मराठा आरक्षणावर समाधानकारक काम

छत्रपती संभाजीनगर (दै. संध्या): राज्याचे जलसंपदा मंत्री तथा मराठा उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज मराठा आरक्षणाच्या मुद्यावर समाधानकारक काम झाल्याचा दावा केला. मराठा आरक्षणाच्या बाबतीत मिसिंग लिंक शोधण्याच्या बाबतीत अनेक ठिकाणी समाधानकारक काम केले आहे. पण या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्येक तालुक्याला जाऊन सॅम्पल केसेसचा आढावा घेतला पाहिजे. वस्तुस्थिती काय आहे? हे समजून घेतले पाहिजे. ग्राऊंड रिपोर्ट काय सांगतो व आपल्याला येणारा अहवाल काय सांगतो हे पाहिले पाहिजे, असे ते म्हणालेत. छत्रपती संभाजीनगर येथे आज मराठा समन्वय समितीची बैठक झाली. या बैठकीला मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह भाजप आमदार प्रसाद लाड उपस्थित होते. या बैठकीनंतर बोलताना विखे पाटील म्हणाले, आज आम्ही मराठा आरक्षणाचा विस्ताराने आढावा घेतला. या प्रकरणी मुख्य प्रश्न जात प्रमाणपत्र देण्याचा आहे.

# शरद पवारांचा एक फोन अन् पुण्यात उमेदवारी फायनल
## *विधान परिषदेसाठी श्रीकांत पाटील मैदानात, पवारांचा मास्टरस्ट्रोक*

**पुणे (दै. संध्या)**



पुणे विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीत महत्त्वाच्या राजकीय हालचालींना वेग आला असून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाने अखेर आपला उमेदवार निश्चित केला आहे. पुणे शहराध्यक्ष श्रीकांत पाटील यांच्या नावावर अखेर शिक्कामोर्तब करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी स्वतः फोन करून श्रीकांत पाटील यांना उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या सूचना दिल्याचं समजत आहे. त्यामुळे पुण्यातील विधान परिषद निवडणुकीत आता राजकीय वातावरण आणखी तापण्याची चिन्हं दिसत आहेत.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, श्रीकांत पाटील हे काही वेळातच आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. गेल्या काही दिवसांपासून पुणे विधान परिषद जागेसाठी अनेक नावांची चर्चा सुरू होती. मात्र अखेर शरद पवार यांनी थेट हस्तक्षेप करत श्रीकांत पाटील यांच्या नावाला अंतिम मान्यता दिली. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने पुण्यात संघटनात्मक ताकदीवर भर देत स्थानिक नेतृत्वाला संधी दिल्याचं मानलं जात आहे. दरम्यान, महाविकास आघाडीच्या बैठकीनंतर विधान परिषद जागावाटपाचं चित्र जवळपास स्पष्ट झालं आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी माध्यमांशी बोलताना सांगितलं की, 17 जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीत 15 जागांवर उमेदवार निश्चित झाले आहेत. फक्त नाशिक आणि नांदेड या 2 जागांवर अजून चर्चा सुरू असून तिन्ही पक्षांनी दावा कायम ठेवला आहे. उर्वरित जागांवर मात्र एकमत झाल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. महाविकास आघाडीच्या फॉर्म्युल्यानुसार काँग्रेस 8 जागांवर निवडणूक लढवणार आहे. तर ठाकरे गटाला रत्नागिरी, जळगाव, परभणी आणि हिंगोली या जागा देण्यात आल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट पुणे, ठाणे, सातारा आणि सांगली या जागांवर उमेदवार देणार आहे. त्यामुळे पुण्यातील लढत आता अधिक प्रतिष्ठेची मानली जात आहे. श्रीकांत पाटील यांच्या उमेदवारीमुळे पुण्यातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचं वातावरण निर्माण झालं आहे.

दुसरीकडे महायुतीतही जागावाटपाचा तिढा जवळपास सुटल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. 17 पैकी 16 जागांवर महायुतीत जवळपास सहमती झाली असून त्यातील 10 जागा भाजप, 4 जागा शिवसेना आणि 2 जागा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट लढवणार असल्याचं सांगितलं जात आहे. छत्रपती संभाजीनगर-जालना या जागेबाबत अजून चर्चा सुरू असून त्यावर अंतिम निर्णय लवकरच होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विधान परिषद निवडणुकीत महाविकास आघाडी आणि महायुती यांच्यात जोरदार राजकीय चुरस रंगणार असल्याचं स्पष्ट होत आहे.

## ढिंग-टांग




## सरकारचे शिष्टमंडळ अंतरवाली सराटीत : अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेमुळे कामात अडथळे : मी उपोषण करणारच - मनोज जरांगे

# ५८ लाख नोंदी सापडल्या आहेत त्यांना कुणबी प्रमाणपत्र द्या : मनोज जरांगे

**जालना (दै. संध्या)**



इतिहासात आजपर्यंत झालं नाही असं, उपोषण 30 तारखेपासून सुरू करणार असल्याचा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. त्यांनी उपोषणाचा इशारा दिल्यानंतर आज राज्य सरकारचे शिष्टमंडळ जरांगे यांना भेटायला आले होते. यावेळी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, भाजप नेते प्रसाद लाड उपस्थित होते. यावेळी विखे पाटलांनी अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेमुळे प्रमाणपत्र देण्यात अडथळे येत असल्याचा आरोप केला आहे. तसेच मनोज जरांगे यांनी 58 लाखांच्या नोंदी आणि त्यांचे प्रमाणपत्र देण्यात यावे अशी मागणी केली आहे. या संपूर्ण चर्चेनंतर विखे पाटील आयुक्तांशी बोलून संध्याकाळपर्यंत निरोप देणार आहेत. त्यानंतरच मनोज जरांगे यांचे उद्याचे उपोषण होणार की नाही ते ठरणार आहे. पत्रकार परिषदेत बोलताना राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, आज या ठिकाणी माननीय मनोज जरांगे पाटील यांच्या विविध मागण्यांच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी आलो आहोत. जात प्रमाणपत्र देण्याबाबतचे काम अतिशय संथगतीने सुरू असल्याचे त्यांनी सांगितले आहे. तसेच ही प्रक्रिया वेगाने केली पाहिजे अशी त्यांची मागणी आहे. आपल्या संभाजीनगरचे जे आयुक्त आहेत, त्यात आपण एक एसओपी तयार केली आहे. त्यामुळे या सगळ्या प्रक्रियेला वेग मिळेल आणि सुलभता येईल.

पुढे बोलताना राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, हैदराबाद गॅझेटची अंमलबजावणी सुरू होताना, आपल्याकडे नोंदी आहेत, पण नंबर नाहीत. काही ठिकाणी वंशावळीचे दाखले देता आले. जरांगे यांनी मागे एकदा कन्नडच्या उपविभागीय आयुक्तांची तक्रार केली होती. त्याविषयी मी आज माहिती घेतली आणि त्यात असे दिसून आले की वंशावळी समितीने मान्य केलेली जात प्रमाणपत्र त्या उपविभागीय अधिकाऱ्यांनी अमान्य केले होते. त्यानंतर ते जिल्हाधिकाऱ्यांकडे अपील झाले आणि त्यांनी वंशावळी समितीचा निर्णय कायम ठेवला. ऑक्टोबर 2025 पासून ते प्रकरण कन्नड प्रांतांकडे प्रलंबित होते. त्याचा आढावा घेण्यात आला. अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेमुळे या कामात अडथळे निर्माण झाले होते, त्यावर कारवाई करण्याच्या सूचना मी केल्या आहेत. साधारण आत्तापर्यंत अडीच लाख प्रमाणपत्र दिले होते आणि समिती गठित दाखल झाल्यानंतर 61 हजार प्रमाणपत्र दिले गेले आहेत. पण समाधानकारक काम होत नसल्याचा जरांगे यांचा आक्षेप आहे. आता मार्चपासून थोडी गती देण्याचा प्रयत्न झाला आहे. आता पुढच्या काही महिन्यात निश्चितच चांगले निकाल दिसतील असे मी आश्वासन देतो. या सगळ्या आंदोलनात जे काही गुन्हे दाखल झाले होते, मला असे वाटते की 668 गुन्हे होते, त्यापैकी 567 गुन्हे मागे घेतले आहेत. कोर्टात 191 गुन्हे प्रलंबित असून तेही मागे घेण्यात येतील. यातील काही गुन्हे राहतील त्यात काही गंभीर स्वरूपाचे गुन्हे होते. कारण शेवटी दुर्दैवाने काही घटना घडल्या होत्या. पण, या गुन्ह्यात काही शिथिलता करता येईल का, असेही आम्ही पाहणार आहोत.

राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, ज्या वारसदारांना, जी शहीद झालेली कुटुंबे आहेत, त्यांच्या कुटुंबाला सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे. आता शेत कुटुंबातील मुलांना नोकरी देण्याचा मुद्दा होता. त्यात महामंडळात अनेकांना नोकऱ्या दिल्या होत्या, काही मुलांनी त्या नोकऱ्या नाकारल्या असल्याची माहिती विखे पाटलांनी दिली आहे. तसेच समाज बांधवांना न्याय देण्याची भूमिका ही सरकारची आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. हैदराबाद गॅझेट सध्या न्यायालयात प्रलंबित असल्याने सातारा गॅझेटचे काम अद्याप सुरू झाले नाही. मात्र, सातारा गॅझेटची अंमलबजावणी केली जाणार आहे. न्यायालयात प्रलंबित असल्याने सरकारने सावध भूमिका घेतली असल्याची माहिती विखे पाटलांनी दिली आहे. यावेळी शिंदे समितीने किती नोंदी शोधल्या असा सवाल जरांगे यांनी उपस्थित केला. त्यावर उत्तर देताना राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, शिंदे समितीत 58 लाख नोंदी सापडल्या आहेत. यातील काही दाखले देण्यात आले आहेत. तसेच एकूण 12 लाख नोंदी राज्यात वितरित करण्यात आल्या आहेत, अशी माहिती विखे पाटलांनी दिली. मात्र, यावर जरांगे यांचे काही समाधान झाले नाही. त्यानंतर मनोज जरांगे यांनी त्यांच्याकडे असलेल्या डेटाची माहिती दिली. 57 लाख 41 हजार नोंदी सापडल्याचे सरकारने सांगितले होते, असे जरांगे म्हणाले.

असली समिती आणि असला जज असतो का कुठे? असे म्हणत मनोज जरांगे यांनी उपोषण करणार असल्याचे पुन्हा स्पष्ट केले आहे. त्यानंतर राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले 57 लाख नोंदी जरी सापडल्या असल्या तरी त्यातल्या सगळ्यांनाच लाभ मिळेल असे नाही. साधारण 35 ते 40 लाख लोकांना वाटप झालेले आहे. पूर्ण राज्यात 31 लाख दाखले वितरित करण्यात आले आहेत. शिंदे समिती स्थापन झाल्यानंतर 3 लाख दाखले वितरित करण्यात आले.

### फडणवीस साहेबांनी सूचना दिल्या तर लगेच प्रमाणपत्र मिळतील

पुढे बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले, फडणवीस साहेबांनी जर सूचना दिल्या हैदराबाद गॅझेटनुसार मराठवाड्यातला मराठा हा कुणबी आहे. त्यांना प्रमाणपत्र देऊन टाका, लगेच वाटप सुरू होईल. फडणवीसांना विचारल्याशिवाय कुठलेच काम होत नाही. माझी भावना तुम्ही समजून घ्या. दरम्यान, यापूर्वी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मनोज जरांगे पाटील यांनी आपल्या आंदोलनामागील वेदना मांडल्या. उपोषणामुळे माझे प्रचंड हाल होतात, पोटात आग होते, तरीही समाजाच्या लेकरांसाठी मी उन्हात स्वतःला झिजवत आहे, असं ते म्हणाले. मराठा समाजाच्या मुलांवर अन्याय होत असल्याचा आरोप करत त्यांनी सरकारला थेट सवाल केला. आमचं काही चुकलं असेल तर आम्हाला फासावर द्या, पण गोरगरीब मराठ्यांचं आयुष्य का उद्ध्वस्त करताय? असा संतप्त प्रश्न त्यांनी उपस्थित केला. सरकार केवळ राजकारण, निवडणुका आणि पक्षफोडीत व्यस्त असल्याचा आरोपही त्यांनी केला.

### गॅझेटनुसार मराठवाड्यातला मराठा हा कुणबी- मनोज जरांगे

मराठवाड्यातला मराठा हा कुणबी आहे गॅझेटनुसार, मग त्या गॅझेटनुसार दिली किती? असा प्रश्न मनोज जरांगे यांनी उपस्थित केला. त्यावर विखे पाटील म्हणाले, हैदराबाद गॅझेटमध्ये नंबर आहेत, त्यातून शोधून लोकांना अर्ज करायला सांगितले आहे. अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की लोकांचे अर्ज येत नाहीत. मनोज जरांगे म्हणाले, 58 लाख नोंदी नावासह आणि त्याचे प्रमाणपत्र द्या. ज्यांचे कुणबी प्रमाणपत्र निघाले त्यांचे व्हॅलीडीटी द्या. हैदराबाद गॅझेट प्रमाणे कुणबी प्रमाणपत्र अधिकारी देत नाहीत. आम्हाला आमची जातच कळत नाहीये. तुम्ही जुनं काढूच नका. आता निघालेल्या 58 लाखांच्या नोंदी द्या. हैदराबाद गॅझेटनुसार एक सुद्धा प्रमाणपत्र दिले नाही असे आमचे म्हणणे आहे. हैदराबादला तुम्ही काय करा 90 आणि 1994 चा जो जीआर काढला आहे, त्यानुसार नियमावली लावा कारण आमच्याकडे पुरावा आहे.

# संपादकीय

## मराठी माणूस अन् अस्मिता

वेगवेगळ्या जनआंदोलनांमध्ये काही घोषणा अशा असतात, ज्या संपूर्ण समाजाला एक मोठी वैचारिक कलाटणी देतात. मुंबई आणि महाराष्ट्राच्या संदर्भात 'मराठी माणूस नेमका कुठे आहे?' या ज्वलंत प्रश्नाला वाचा फोडणारी अशीच एक ऐतिहासिक आणि मार्मिक घोषणा १९६६च्या सुमारास मुंबईत घुमली होती - 'वाचा आणि थंड बसा !' हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी 'मार्मिक' साप्ताहिकामधून ही मालिका सुरू केली होती. त्याकाळी मुंबईतील विविध नामांकित बँका, औषध कंपन्या, शैक्षणिक संस्था आणि आंतरराष्ट्रीय कार्यालयांमध्ये कोण कुठल्या पदावर कार्यरत आहे, याची एक यादीच बाळासाहेबांनी प्रसिद्ध करायला सुरुवात केली. ही यादी जशी समोर येत गेली, तसे एक धक्कादायक वास्तव लोकांसमोर आले. या सर्व बड्या संस्थांवर दाक्षिणात्य लोकांचा प्रचंड प्रभाव होता, तर वरिष्ठ स्तरावर मराठी माणूस पार गायब होता. कनिष्ठ स्तरावर केवळ कारकून किंवा शिपाई म्हणून राबणारा मराठी माणूस आणि वरिष्ठ पदांवर विराजमान असणारे दाक्षिणात्य, हे चित्र पाहून मराठी माणसाला आपल्याच मातीत आपण उपरे असल्याचे जाणवू लागले. बाळासाहेबांच्या या धारदार लेखणीने मराठी माणसाची सुप्त अस्मिता जागी केली. 'वाचा आणि थंड बसा' ही केवळ घोषणा नव्हती, तर त्यात एक उपरोधिक टोमणा होता, ज्याचा खरा अर्थ होता - 'वाचा आणि विचार करा, विचार करा आणि त्यानुसार कृती करण्यासाठी पेटून उठा!'. या एका घोषणेने महाराष्ट्रात एका सुव्यवस्थित आणि शिस्तबद्ध आंदोलनाला जन्म दिला. येथूनच शिवसेनेच्या प्रभावाची पहाट झाली. १९६६च्या दशकानंतर अनेक वर्षे उलटली, तरी मराठी भाषा मुळापासून उखडली जाऊ नये म्हणून मराठी राज्यकर्त्यांना आणि शासनाला सातत्याने प्रयत्न करावे लागले. महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये- मग त्या इंग्रजी माध्यमाच्या का असेनात- मराठी भाषा अनिवार्य करण्याचा ऐतिहासिक निर्णय राज्य सरकारने घेतला. मात्र, २०१८ नंतरही अनेक शाळांनी या कायद्याला योग्य तो मान दिला नाही. 'मराठी शिकवणारे शिक्षक उपलब्ध नाहीत' किंवा 'मुलांना पर्यायी भाषा निवडण्याचा अधिकार आहे' अशी पळवाट शोधणारी भूमिका अनेक शाळांच्या व्यवस्थापनाने घेतली. परिणामी, मराठी भाषेचा प्रसार हवा तसा झाला नाही. याला पर्याय म्हणून काही मराठी शाळांनी 'द्विभाषिक' (इंग्रजी आणि मराठी दोन्ही माध्यमांतून) शिक्षण देण्याचा स्तुत्य उपक्रम सुरू केला, ज्याला चांगला प्रतिसादही मिळत आहे. काही काळापूर्वी जेव्हा महाराष्ट्र शासनाच्या परिवहन विभागाने रिक्षाचालकांसाठी 'मराठी भाषा बोलणे अनिवार्य' करण्याची मोहीम हाती घेतली, तेव्हा काही घटकांनी त्याला जाणीवपूर्वक विरोध केला. 'आम्ही मराठी बोलणारच नाही' अशी ताठर भूमिकाही काहींनी घेतली. मुळात एक साधा जागतिक नियम आहे- तुम्ही ज्या राज्यात, ज्या देशात राहता, तिथली रोजगाराची भाषा तुम्हाला शिकावीच लागते. परदेशात गेल्यावर तर दोन-तीन महिने तिथली भाषा आणि शिष्टाचार समजून घेतल्याशिवाय तुम्हाला कामावर स्वीकारलेच जात नाही. मग महाराष्ट्रात राहून मराठीला विरोध का? मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नाही, तर या मातीने तुम्हाला दिलेल्या रोजगाराबद्दल, आश्रयाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचे ते एक महत्त्वाचे पाऊल असते.



## संस्कृत सुभाषित

परिश्रमो मिताहारो भूगतावाश्विंनी सुतौ ।
तावनाहृत्य नैवाहं वैधमन्यं समाश्रये।।

अर्थ – परिश्रम आणि अल्प आहार या दोन गोष्टी म्हणजेच पृथ्वीवरचे आश्विंनीकुमार होत. या दोन गोष्टींकडे दुर्लक्ष केल्यामुळे त्रास होतो, तर त्यांचा आदर केल्यामुळे अन्य वैद्याकडे जावे लागत नाही.

## गुरु वचन

### नशिबात असेल तेच मिळेल

एका गावात सोमिलक नावाचा कष्टाळू कोष्टी होता. तो तलम कापड विणण्यात पटाईत होता. पण कष्ट भरपूर करूनसुद्धा अपेक्षित मोबदला त्याच्या हाती येत नव्हता. त्याच्या बरोबरचे इतर कोष्टी जाडंभरडं कापड विणूनसुद्धा भरपूर पैसा कमवित होते.

सोमिलकाने दुसऱ्या गावी जाऊन धंदा करण्याचे ठरविले. पण सोमिलकाची बायको त्याला म्हणाली, ''कशाला उगाच दुसऱ्या गावात जाता.... आपल्या नशिबात भरपूर पैसा मिळणार असेल तर याच ठिकाणी कापड विणून मिळेल. पण नशिबात जर नसेल तर दुसऱ्या गावी जाऊनही उपयोग काय?'' तरी हट्टाने सोमिलक दुसऱ्या गावी जातो. भरपूर कष्ट करतो आणि तिनशे मोहरा कमावतो.

त्या मोहरा घेऊन आपल्या गावी येण्यास निघतो. दमल्यामुळे एका झाडाखाली विश्रांती घेता घेता त्याला झोप लागते. थोड्यावेळाने दोन माणसांच्या संभाषणाच्या आवाजामुळे झोप उडते. त्या दोघांचे संभाषण सोमिलक ऐकतो.

''अरे, कर्त्या... सोमिलकाने आता तीनशे मोहरा कमावल्या पण त्याच्या नशिबात फक्त अन्नवस्त्रापुरताच पैसा आहे'' कर्म विचारतो. त्याबरोबर कर्ता उद्गारतो, ''त्याने कष्ट केले त्याचे फळ मी दिले. ते फळ त्याच्याकडे ठेवायचे की नाही हे तुझं काम!''

दे घोघेजण सोमिलकाचे कर्म आणि कर्ता असतात. सोमिलक पूर्ण जागा होऊन आपली मोहरांची पिशवी बघतो तर ती रिकामी असमे!

## उपदेशकथा

भारतीय संगीत क्षेत्रातील एक थोर संशोधक, संगीतशास्त्रकार व संगीतप्रसारक पं. विष्णू नारायण भातखंडे हे दुर्मिळ रागरागिण्या नि चिजा गोळा करता करता रामपूर रियासतीत पोचले. तेथील नबाब संगीताचे मोठे जाणकार नि गुणीजनांचे पोशिंदे. नबाबांचे एक दरबारी छम्मनसाहब भातखंड्यांचे चाहते. त्यांनी पंडितजींचे 'मिशन' नबाबांना समजावून सांगितले. नबाब राजी झाले पण अट घातली की, दुर्मिळ बंदिशी पाहिजे असतील तर आमच्या उस्तादांचा गंडा बांधला पाहिजे. पंडितजींपुढे संकट उभे राहिले. छम्मनसाहेब म्हणाले, 'अहो, तुम्ही तर वकीलही आहात ना? स्वत:च मामला पेश करा.' मग दरबार भरल्यावर पंडितजींनी कान पकडले नि गंडा बांधण्यास नकार दिला. नबाबांनी कारण विचारले. त्यांनी उत्तर दिले, 'आपले उस्ताद तर काबिलच आहेत; पण मी त्यांचा मुरीद (चेला) झालो तर हुजुरांचा गुरुभाई ठरेन. मेरी क्या मजाल की ऐसा ठीठपन करूँ? गुस्ताखी माफ हो तो हुजुरसे ही गंडा पाने की अर्ज कर सकता हूँ।' यावर नबाबांची कळी खुलली. त्यांनी मणभर मिठाई आणवली. गंडा बांधला नि पंडितजींना शंभरावर अनवर रागांची नोटेशन्स दिली.

कथा उपदेश : युक्तीप्रयुक्तीने आपले काम साधता आले पाहिजे.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | १३:२०:०९ |
| ३० मे २०२६ | योग:शिव २९:२४:०९+ |
| शनिवार | करण:वणिज ११:५८:१३ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:विष्टि २५:०५:३८+ |
| अधिक ज्येष्ठ शके | सूर्य:वृषभ |
| संवत्– १९४८ | चन्द्र:वृश्चिक०६:३८:३२ |
| संवत्सर – पराभवनाम | हिजरी सन् – १४४६ |
| अयन– उत्तरायणारंभ | मुस्लिम मास – जिल्काद |
| मास– अधिक ज्येष्ठ | तारीख – १३ |
| ऋतु– सौर ग्रीष्म | विशेष |
| शुक्ल पक्ष | गोवा राज्य दिन |
| तिथि:चतुर्दशी ११:५८:१३ | पौर्णिमा प्रारंभ |
| नक्षत्र:विशाखा | सकाळी ११.५७ |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९६४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | | | | | 4 | 6 | |
| 7 | | | 5 | 2 | | | 3 | 9 |
| 4 | | | | 9 | | 8 | 7 | |
| 1 | | | 4 | | | 9 | 8 | |
| | | 4 | 6 | | 7 | 3 | | |
| | 8 | 7 | | | 9 | | | 6 |
| | 4 | 2 | | 5 | | | | 3 |
| 8 | 7 | | | 6 | 3 | | | 4 |
| | 9 | 3 | | | | | 1 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९६३ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 2 | 8 | 5 | 3 | 9 | 1 | 7 | 6 |
| 3 | 9 | 7 | 6 | 8 | 1 | 4 | 2 | 5 |
| 6 | 5 | 1 | 4 | 2 | 7 | 8 | 3 | 9 |
| 8 | 4 | 2 | 9 | 1 | 6 | 7 | 5 | 3 |
| 5 | 3 | 6 | 7 | 4 | 2 | 9 | 1 | 8 |
| 7 | 1 | 9 | 8 | 5 | 3 | 6 | 4 | 2 |
| 9 | 7 | 3 | 2 | 6 | 4 | 5 | 8 | 1 |
| 2 | 6 | 5 | 1 | 7 | 8 | 3 | 9 | 4 |
| 1 | 8 | 4 | 3 | 9 | 5 | 2 | 6 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १४३१ – फ्रांसच्या रुआ शहरात जोन ऑफ आर्कला जाळून निधन दंड.
- १४९८ – कोलंबस त्याच्या तिसऱ्या सफरीवर निघाला.
- १५३९ – स्पेनचा शोधक व कॉंकिस्तादोर हर्नान्दो दि सोटो ६०० सैनिक घेउन फ्लोरिडात उतरला.
- १५७४ – हेन्री तिसरा फ्रांसच्या राजेपदी.

### राष्ट्रीय

- १५७६ – राणा प्रताप आणि राजपूत सलीम यांचच्यामध्ये हळदीघाटचा संग्राम सुरू झाला.
- १९३४ – मुंबई नभोवाणी केंद्राची सुरुवात.
- २००६ – जम्मू–काश्मीरच्या बारामुल्ला जिल्ह्यात वूलर तलावात एक नाव उलटून २२ जणांचा मृत्यू झाला.
- २००८ – नवी दिल्लीत गाजलेल्या नीतीश कटारा हत्याप्रकरणी विकास आणि विशाल यादव या दोघा भावांना दिल्लीतील न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

### जन्म

- १०१० – रेनझाँग, चीनी स्राटचा जन्म.
- १६७२ – पीटर द ग्रेट, रशियाचा झारचा जन्म.
- १८७९ – कॉलिन ब्लाइथ, इंग्लिश क्रिकेटपटूचा जन्म.
- १८९५ – मॉरिस टेट, इंग्लिश क्रिकेटपटूचा जन्म.
- १९०९ – जॉर्ज हेडली, वेस्ट इंडीझचा क्रिकेटपटूचा जन्म.
- १९४९ – बॉब विलिस, इंग्लिश क्रिकेटपटूचा जन्म.

### निधन

- १२५२ – फर्डिनांड तिसरा, कॅस्टिलचा राजा यांचे निधन.
- १४३१ – जोन ऑफ आर्क यांचे निधन.
- १५७४ – चार्ल्स नववा, फ्रांसचा राजा यांचे निधन.
- १५७६ – हरादा नाओमासा, जपानी सामुराईचे निधन.
- १७४४ – अलेक्झांडर पोप, इंग्लिश लेखकाचे निधन.

## : SMS :

Agr basanti ki mausi thakur ko rakhi bandhy to Veeru & thakur ka kia rishta hua?

.

Apna kaam karo Koi rishta nahi banta, Thakur k hath hi nhi thy.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ४०.६ | २५.८ |
| अहमदनगर | ३८.९ | २५.२ |
| अकोला | ४५ | ३०.९ |
| अमरावती | ४४.३ | ३१.१ |
| बीड | ४७ | ३६ |
| भंडारा | ४५.६ | ३२.९ |
| बुलढाणा | ४२ | २४.८ |
| चंद्रपूर | ४६.८ | ३४.५ |
| चेन्नई | ४५.९ | ३३.६ |
| नवी दिल्ली | ४१.३ | २९.५ |
| धुळे | ४३.५ | २८.१ |
| गोंदिया | ४३.८ | ३२.३ |
| जळगाव | ४५.५ | २९.३ |
| कोल्हापूर | ३७ | २४.६ |
| लातूर | ४०.३ | २९.३ |
| मुंबई | ४१.५ | ३७.७ |
| नागपूर | ४५.२ | ३१.९ |
| नांदेड | ४३.७ | ३१.८ |
| नंदूरबार | ४०.५ | २६.२ |
| नाशिक | ३९.१ | २५.१ |
| पुणे | ३६.७ | २३.८ |
| पंढरपूर | ३९.७ | २९.१ |
| सातारा | ३८.१ | २४.५ |
| सांगली | ३९ | २५.१ |
| सोलापूर | ३९.४ | ३०.१ |
| वर्धा | ४६.७ | ३२.८ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : उत्तर
बुद्धि चातुर्याने कामे केल्यास आजचा दिवस चांगला सिद्ध होऊ शकेल.

**वृषभ :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : उत्तर
वाद-विवाद आणि भांडणांनी मानसिक त्रास वाढेल.

**मिथुन :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : उत्तर
जवळच्या व्यक्तींकडून उपयोगी सल्ला मिळेल. राज्यपक्षाच्या कामासाठी दिवस चांगला राहील.

**कर्क :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा: पश्चिम
आर्थिक लाभ झाल्याने आनंद होईल. नोकरीत बढती मिळण्याचे योग येतील.

**सिंह :** शुभ रंग: लाल, अनुकूल दिशा : पश्चिम
कुंटूबासमवेत वेळ मनोरंजनात जाईल. व्यापारात नवीन संबंध जुळून येतील, जे भविष्यात फायदेशीर ठरतील.

**कन्या :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : दक्षिण
आपल्या प्रयत्नांनी घरगुती समस्या सुटतील. आर्थिक स्थिती उत्साहवर्धक राहील.

**तुळ :** शुभ रंग : केसरी, अनुकूल दिशा : पश्चिम
धाडसाने विरोधकांचा पराभव करु शकाल. सामाजिक प्रशंसनेने आनंद होईल.

**वृश्चिक :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : उत्तर
सामाजिक कार्यात आपला सहभाग राहील. महत्तवाची कामे पूर्ण करु शकाल.


**धनु :** शुभ रंग : जांभळा, अनुकूल दिशा : पश्चिम
वेळेवर कामे न झाल्यामुळे चिंता वाढेल. खर्च अधिक होईल.

**मकर :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : दक्षिण
जुनी समस्या दूर होण्याची शक्यता आहे. दृढ निश्चय असल्या कारणाने प्रत्येक क्षेत्रात यश मिळेल.

**कुंभ :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : उत्तर
कौटूंबिक तसेच संपत्ती संबंधातील अडचणींचे समाधान शक्य आहे. मिळकतीत वाढ होईल.

**मीन :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : उत्तर
सज्जन माणसांचा सहवास लाभेल. अभ्यासात मन रमेल. समाजात मान प्रतिष्ठा तसेच लोप्रियता मिळेल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९६४



### आडवे शब्द

१. कुप्रसिद्ध ३. अमर करणारे पेय ६. कृती, अंमलबजावणी १०. अभिप्राय ११. शिळाच्या विरुद्ध १२. सैनिकांचा जयजयकार १३. भीती १४. तंबूची कापडी भिंत १६. जाणे १७. वांतीपूर्वीची स्थिती १९. सोने, २. चेला २४. करपलेला भाग २५. लक्ष्मीचे एक नाव २६. हुबेहूब सोंग वठवणारा २८. आत्या ३०. करंजी ३२. पात्याची तीक्ष्णता ३३. मिंधा ३५. घट्ट, रसाने भरलेले ३९. लोणी ४१. मडके ४३. माणूस ४४. निर्माता ४६. नमस्कार ४८. पत्र ५१. स्वकर्तृत्वावर भरवसा ठेवायला सांगणारी म्हण 'अपना हाथ ----!' ५२. शूर ५३. मेहरबानी ५४. खंड न पडता ५६. जन्म-मृत्यू यामधील कालपट ५८. रात्र ५९. शोध, माग ६०. निवासस्थान ६१. दूर करणारा ६२.हात, ६४. जीभ ६६. तलाव, विहीर इ. ६८. जाहिरातवजा कागद ७१. संन्याशांचे वसतीस्थान ७३. अग्नी ७४. अहंकार ७५. मार्ग, ७६. मित्र, ७८. आंब्याची बी ७९. हक्कदार ८०. पुन्हा ८१. धुंदी ८२. तुरुंग ८३. सावली ८४. मीठ, लवण

### उभे शब्द

१. ताज्या दमाचे मनुष्यबळ २. सुप्रसिद्ध ३. गबाळ ४. सूर्य ५. नवरा ६. अंजनाचा एक प्रकार ७. जाडसर पीठ ८. उणीव पीठ ९. चरण १३. आगामी काळ १५. आस्था, प्रेम १८. प्राणंतिक वेदना १९. कलावंत २०. किंचित कडू २१. द्रव्य, २२. पाषण २३. संतोष, आनंद २५. कमळाचे तळे २७. दगड, लाकूड याचा पापुद्रा २९. वरपांगी, दिखाऊ ३१. -- लुचपत, अवैध द्रव्य ३४. गवत ३६. प्रफुल्लित ३७. मसाल्यातील पत्र ३८. आजूबाजूला ४०. घाणेरडे, हीन काम ४२. इच्छा (हिंदी) ४५. काळजी घेणारा ४६. पर्वत ४७. नाकावरील मोत्याचा दागिना ४९. झाडाभोवतीचा कट्टा, ५०. असामान्य ५१. आई-वडील ५३. दया करण्याजोगा ५५. अंधार ५७. आशीर्वाद ५८. योग्य, उचित ६२. दुलर्क्ष, हेळसांड ६३. माजलेला ६५. प्रसिद्ध ६७. रक्ताचा रंग ६९. झटकन ७०. चित्रपटाची गोष्ट, ७२. चोर, लबाड ७६. पावसाची झड ७७. संस्थाप्रमुख (इंग्रजी) ७८. न वापरलेला ७९. भ्रम, मिथ्या जग

### जम्बो शब्दकोडे क्र. ९६३ चे उत्तर

आडवे उत्तर १. अल्पोपहार ४.मजल ७.चपखल ११.हार १२.गवर १३.बासरी १४.शतकवीरा १७.बदबदा १९.गारूड २१.कूळ २२.रखवाली २४.कवण २५.नत २६.रामराम २७.झूलकरी २९.अनुत्तीर्ण ३१.तरण ३२.पाक ३३.नीटस ३५.मावशी ३७.घोळ ३८.राजमाता ३९.कृष्णावतार ४२.समोर ४४.तगाई ४५.रमेश ४७.मीन ४९.क्षमा ५०.तटस्थ ५२.वावर ५३.रम ५६.जनकल्याण ५७.महाशय ५९.दरदाम ६१.रती ६२.नरक ६३.टिकटिक ६५.होळी ६६.बेरंग ६८.म्यान ७०.मन ७२.तुलसीदास ७४.नगरी ७६.भरण ७७.नवल ७९. दमदार ८०.कातीव ८१.ढाल तलवार

उभे उत्तर : १.अपशकुन २.पलक ३.रखरख ४.महाबली ५.जरड ७.चव ८.परगाव ९.लबाड १०.बारीकसारीक १५.तळतळाट १६.वीरगती १८.बदाम २०.रूणझुण २३.वामनावतार २४.कमतरता २६.रास २८.कपाळमोक्ष ३०.पाशी ३२.नित्यातला ३४.सराईत ३५.मामा ३६.तृष्ण ३७.घोस ३९.कृश ४०.वणवण ४१.रमी ४३.रमानायक ४६. मेहनत ४८.नरम ५१.टकमक ५२.वाल्या कोळी ५४.तहान ५५.दीर ५६.जरक ५८.शरमिंदा ५९.दरम्यान ६०.दाट ६१अ.परंतु ६५.होन ६७.गलबत ६९.नगद ७०. मणका ७१.घाव ७३.समीर ७५.दम ७७.नव ७८.लढा

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### ऐतिहासिक “सुवर्णद्वीप” पुस्तकाचे 6 जून रोजी होणार प्रकाशन

पुणे (दैनिक संध्या) : प्राचीन भारत आणि इंडोनेशिया यांच्यातील सांस्कृतिक व ऐतिहासिक संबंध उलगडणाऱ्या “सुवर्णद्वीप - हिंदू बुद्धिस्ट किंगडम्स ऑफ एन्शंट इंडोनेशिया" या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन ६ जून रोजी करण्यात आले आहे. अशी माहिती पुस्तकाच्या लेखिका ऋता उंबरजे आणि संगीता चाफेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. कार्यक्रमाबद्दल अधिक माहिती देताना त्यांनी सांगितले की “सुवर्णद्वीप - हिंदू बुद्धिस्ट किंगडम्स ऑफ एन्शंट इंडोनेशिया" या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा ६ जून २०२६ रोजी सायंकाळी ६.१५ वाजता फिरोदिया ऑडिटोरियम, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था येथे होणार आहे. यावेळी माजी आयसीएचआर अध्यक्ष डॉ. ए. पी. जामखेडकर यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. जी. बी. देगलूरकर हे राहणार असून, डॉ. अंबरीश खरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. सागरी आग्नेय आशियातील प्राचीन भारतीय संस्कृतीचा प्रभाव, हिंदू-बौद्ध राज्यांची परंपरा, वास्तुकला, साहित्य, भाषा आणि सांस्कृतिक वारसा यांचा सखोल अभ्यास या पुस्तकातून मांडण्यात आला आहे. व्यापार, समुद्री प्रवास आणि सांस्कृतिक देवाणघेवाण यांच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीने इंडोनेशियासह अनेक देशांवर प्रभाव टाकला असून, त्या ऐतिहासिक नात्याचा मागोवा या पुस्तकात घेण्यात आला आहे. भारतीय संस्कृतीचा जागतिक विस्तार आणि भारत-इंडोनेशिया यांच्यातील समृद्ध सांस्कृतिक संबंध नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे हा या पुस्तकाचा उद्देश असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले. ‘अपरांत’ प्रकाशनातर्फे प्रकाशित करण्यात आलेले हे पुस्तक वाचकांना ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाचा नवा दृष्टिकोन देणारे ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या डिझेल बचतीच्या अनुषंगाने उपाययोजना

■ इलेक्ट्रिक वाहनाच्या वापरामुळे सुमारे ११ हजार लिटर डिझेलची दैनंदिन बचत-विभाग नियंत्रक अरुण सिया

पुणे (दैनिक संध्या) : माहे मे २०२६ पासून पेट्रोल, डिझेल व सीएनजी इंधनामध्ये झालेल्या दरवाढीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या पुणे विभागाने आगार पातळीवर डिझेल बचतीसाठी उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत, विभागात १०५ इलेक्ट्रिक वाहने असून दैनंदिन ४६ हजार २३२ किलोमीटर चालनात येतात, त्यामुळे जवळपास १० हजार ९८१ लिटर डिझेलची दैनंदिन बचत होत आहे. येत्या काळात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर पूर्णक्षमतेने करण्याबाबत नियोजन करण्यात येत आहे, अशी माहिती विभाग नियंत्रक अरुण सिया यांनी दिली आहे. पुणे विभागातील आगारांना आगार पातळीवर उद्दिष्टे निश्चित करुन देण्यात आलेली आहे. प्रत्येक आगाराने मागील वर्षाच्या तुलनेत १ ने किलोमीटर प्रति १०लिटरमध्ये (केपीटीएल) वाढ करण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. ज्या फेऱ्यांचे उत्पन्न कमी झालेले आहेत त्या फेऱ्या तात्पुरत्या स्वरुपात स्थगित करण्यात आल्या आहेत. विभाग किंवा आगार पातळीवर चालकांच्या केपीटीएलमध्ये वाढ होण्याकरीता त्यांना प्रबोधन करण्यात येत आहे तसेच वरिष्ठ पातळीवरुन मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत, अशी माहिती श्री. सिया यांनी दिली आहे.

### कृषी विभागाच्या भरारी पथक व गुणवत्ता नियंत्रण पथकाची कारवाई

■ ३४ वितरकांचे परवाने निलंबित

पुणे (दैनिक संध्या) : खरीप हंगाम २०२६ मध्ये निविष्ठांची गुणवत्ता राखण्याच्यादृष्टीने जिल्हास्तरीय भरारी पथक स्थापन करण्यात आले असून पथकाच्यावतीने करण्यात आलेल्या तपासणीत ३४ वितरकांचे परवाने निलंबित करण्यात आले आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यातील भेसळयुक्त खते, बियाणे व कीटकनाशके यांच्या विक्रीस आळा बसण्यास मदत होणार असल्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी कळविले आहे. गुणवत्ता नियंत्रण निरिक्षकांनी जिल्ह्यामध्ये वितरकांच्या तपासण्या केल्या, तपासणी दरम्यान गंभीर अनियमियता आढळलेल्या वितरकांवर कारवाई करण्यात आलेली आहे. कृषी सेवा केंद्र तपासणी वेळी विक्री परवान्यामध्ये साठा रजिस्टर मधील शिल्लक खत साठा व प्रत्यक्षात असलेला खत साठा ताळमेळ न जुळणे, विक्रीस ठेवण्यात आलेल्या कंपनीच्या उत्पादनाच्या स्रोतांचा परवान्यामध्ये समावेश नसणे, ज्यादा दराने विक्री करणे, नोंदणी प्रमाणपत्र विहित मुदतीत नूतनीकरण न करणे, शिल्लक साठा व दरपत्रक दर्शनी भागात न लावणे, शेतक-यांना पक्की बिले न देणे आदी कारणामुळे ३४ वितरकांचे परवाने निलंबित करण्यात आले असून यामध्ये खतांचे २६, किटकनाशके २ व बियाणांचे ६ परवान्यांचा समावेश आहे. तसेच आंबेगाव तालुक्यात ८, भोर -२, दोंड-९, इंदापुर-२, जुन्नर-९ आणि शिरुर – ४ याप्रमाणे परवाने निलंबित करण्यात आले आहे, अशी माहिती श्री. काचोळे यांनी दिली आहे.

### 'लोकशाही दिन' होणार नसल्याची निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांची माहिती

पुणे (दैनिक संध्या) : महाराष्ट्र विधानपरिषदेच्या पुणे स्थानिक प्राधिकरण मतदार संघ निवडणुकीची जिल्ह्यात २५ जून २०२६ पर्यंत आचारसंहिता लागू आहे, त्यामुळे जुन महिन्याच्या पहिल्या सोमवारी १ जून रोजी नियोजित 'जिल्हास्तरीय लोकशाही दिन' होणार नाही. तसेच या लोकशाही दिनाचे जुलै २०२६ महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजन करण्यात येणार आहे, याबाबत सर्व अर्जदारांनी नोंद घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांनी केले आहे.

### हरित क्रांतीतून आदिवासी महिलांना नवे बळ; गडचिरोलीत 200 महिलांना रोजगार

पुणे (दैनिक संध्या) : पर्यावरण संरक्षण आणि ग्रामीण रोजगार यांचा सुंदर संगम घडवणारा “हरियाली का संकल्प – प्रकृती आणि प्रगतीसोबत” हा उपक्रम सध्या गडचिरोली जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरत आहे. सूरजगड इस्पात प्रायव्हेट लिमिटेड आणि एमआयएएम चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पामुळे परिसरातील सुमारे २०० ग्रामीण व आदिवासी महिलांना रोजगाराची नवी संधी उपलब्ध झाली आहे. या उपक्रमांतर्गत सुमारे २५ एकर क्षेत्रावर भव्य रोपवाटिका विकसित करण्यात आली असून येथे तब्बल ५ लाख रोपांची निर्मिती क्षमता उभारण्यात आली आहे. वृक्षारोपण आणि हरित क्षेत्र वाढविण्याबरोबरच स्थानिक नागरिकांसाठी शाश्वत रोजगार निर्माण करण्याचे उद्दिष्ट या प्रकल्पामागे आहे. या रोपवाटिकेमध्ये महिलांना बी पेरणी, रोप निर्मिती, माती तयार करणे, कंपोस्टिंग, पॉलीबॅग तयार करणे तसेच ग्राफ्टिंग आणि कटिंगसारख्या वनस्पती संवर्धन तंत्रांचे प्रशिक्षण दिले जात आहे. त्यामुळे महिलांना रोजगारासोबत कौशल्य विकासाची संधीही मिळत आहे. एमआयएएम चॅरिटेबल ट्रस्टची स्थापना २०२० मध्ये नीतू जोशी यांनी केली होती. ग्रामीण विकास, आरोग्य सेवा, रोजगार निर्मिती आणि सामुदायिक कल्याणासाठी ही संस्था विशेषतः आदिवासी व दुर्गम भागात कार्यरत आहे.

# दारूकांड : शिवसेनेचे पोलीस स्टेशनसमोर ठिय्या आंदोलन

**अवैध दारू हातभट्ट्यांचे जाळे तातडीने उध्वस्त करण्याची मागणी**

पुणे (दै. संध्या)



हडपसर परिसरातील पांढरे मळा येथे विषारी हातभट्टी दारूमुळे निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाल्याच्या अत्यंत संतापजनक घटनेनंतर शिवसेना आक्रमक झाली असून, संबंधित आरोपींवर कठोर कारवाई करून संपूर्ण हडपसर परिसर अवैध हातभट्टीमुक्त करण्याच्या मागणीसाठी आज शिवसेनेच्या वतीने हडपसर पोलीस स्टेशनसमोर तीव्र ठिय्या आंदोलन करण्यात आले. या विषारी हातभट्टी दारूकांडामध्ये राहुल क्षिरसागर, विजय शर्मा, अरुण डाडर, अशोक चव्हाण यांच्यासह एकूण पाच नागरिकांना आपला जीव गमवावा लागला. या घटनेमुळे संपूर्ण हडपसर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गरीब व कष्टकरी नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या या अवैध धंद्यामुळे अनेक कुटुंबांचे संसार उघड्यावर पडले असून अनेक कुटुंबे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहेत. शिवसेनेच्या वतीने आंदोलनादरम्यान आरोप करण्यात आला की, हडपसरसह पुणे शहरातील विविध भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर अवैध गावठी दारू हातभट्ट्या सुरू असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. मात्र, तरीदेखील या अवैध रॅकेटवर प्रभावी कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

या अवैध धंद्यामागे कोणाचा राजकीय वरदहस्त आहे, कोणते अधिकारी गुंतलेले आहेत याची सखोल चौकशी करून संपूर्ण रॅकेट उध्वस्त करण्याची मागणी शिवसेनेने केली.

यावेळी शिवसेना शहरप्रमुख प्रमोद नाना भानगिरे यांनी मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांची भेट घेत त्यांना धीर दिला. तसेच शिवसेनेच्या वतीने या कुटुंबीयांना सर्वतोपरी आर्थिक सहाय्य केले जाईल, असे आश्वासनही त्यांनी दिले,“विषारी दारू पाजून गरीब व कष्टकरी नागरिकांचा जीव घेणाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही. हडपसरसह पुणे शहरातील अवैध हातभट्ट्या आणि दारू माफियांचे जाळे तात्काळ उध्वस्त झाले पाहिजे.

या रॅकेटला संरक्षण देणाऱ्या संबंधितांवरही कठोर कारवाई झाली पाहिजे. अन्यथा शिवसेना आणखी तीव्र आंदोलन छेडून रस्त्यावर उतरेल,” असा इशारा शिवसेना शहरप्रमुख प्रमोद नाना भानगिरे यांनी दिला.

तसेच भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी पोलीस प्रशासनाने विशेष मोहीम राबवून अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर कायमस्वरूपी प्रतिबंधात्मक कारवाई करणे अत्यंत आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, हडपसर परिसर पूर्णपणे अवैध हातभट्टीमुक्त करण्यात यावा, तसेच संपूर्ण पुणे शहरात सुरू असलेल्या अवैध गावठी दारू विक्री व हातभट्ट्यांवर तातडीने मोठी कारवाई करण्यात यावी, या मागण्यांसाठी शिवसेना आगामी काळात अधिक तीव्र जनआंदोलन उभारणार असल्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

या आंदोलनावेळी उपजिल्हाप्रमुख अमर घुले, पंकज कोंद्रे, दत्ता खवळे, अभिजीत बोराटे, दीपक कुलाल, प्रवीण हिलगे, संदेश पावस्कर, अनिकेत सपकाळ, अक्षय तारू, शितल गाडे, शंतनू सरकार, अमित दाभाडे, प्रकाश कालगुडे, माऊली साळुंखे यांच्यासह असंख्य शिवसैनिक उपस्थित होते.

## ‘GOVERNOR’चा ट्रेलर रिलीज

पुणे (दै. संध्या)




विपुल अमृतलाल शाह यांच्या 'सनशाइन पिक्चर्स' बॅनरखाली येणारा चित्रपट 'गव्हर्नर' इतिहासातील त्या अनकथित आणि दडपून ठेवलेल्या पानांना उलगडणार आहे, ज्यांची कधीच चर्चा झाली नव्हती. मनोज बाजपेयी यांच्या दमदार अभिनयाने सजलेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन मराठी सिनेसृष्टीतील प्रसिद्ध आणि दिग्गज दिग्दर्शक चिन्मय मांडलेकर यांनी केले आहे. बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालणाऱ्या 'द केरळ स्टोरी' आणि 'द केरळ स्टोरी 2' सारख्या चित्रपटांचे निर्माते आता प्रेक्षकांसाठी आणखी एक प्रभावी आणि हादरवून टाकणारा सिनेमॅटिक अनुभव घेऊन येत आहेत! मनोज बाजपेयी यांच्या वाढदिवसानिमित्त जेव्हा विपुल अमृतलाल शाह यांच्या आगामी चित्रपट 'गव्हर्नर'चा फर्स्ट लूक पोस्टर समोर आला, तेव्हापासूनच या मॉडर्न हिस्ट्री ड्रामाबद्दल मोठी चर्चा सुरू झाली होती. सस्पेन्सने भरलेल्या टीझरनंतर आता निर्मात्यांनी चित्रपटाचा एक अतिशय दमदार आणि थरारक ट्रेलर रिलीज केला आहे, जो अंगावर शहारे आणतो आणि विचार करायला भाग पाडतो.

चित्रपटाचा ट्रेलर भारताच्या आर्थिक इतिहासातील त्या सर्वात मोठ्या आणि काळ्याकुट्ट अध्यायावर प्रकाश टाकतो, जेव्हा 1990 साली आपला देश कंगाली आणि दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर पोहोचला होता. ढासळणाऱ्या अर्थव्यवस्थेमुळे देशभर निर्माण झालेला गोंधळ आणि रस्त्यावर उतरलेला जनतेचा संताप ट्रेलरमध्ये प्रभावीपणे दाखवण्यात आला आहे.

## सावरकरांना अभिवादन; ‘भारतरत्न’ देण्यासाठी पाठपुरावा करणार

पुणे (दै. संध्या)



स्वातंत्र्यवीर सावरकर फाउंडेशन आणि विश्व हिंदू जागृती फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यातील सारसबाग येथे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमास प्रखर हिंदुत्ववादी मिलिंद एकबोटे आणि सीए सर्वेश मेहेंदळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच स्वातंत्र्यवीर सावरकर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रितम थोरवे, सचिव नयन ठाकूर, विश्वस्त ॲड. श्रीराम जोशी, अमरनाथ देवळालीकर, आर्य नयन ठाकूर, विश्व हिंदू जागृती फाउंडेशनच्या विश्वस्त मुक्तीका वाटखेडकर यांच्यासह मोठ्या संख्येने सावरकरप्रेमी, हिंदुत्ववादी कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या राष्ट्रभक्ती, हिंदुत्व विचारधारा आणि सामाजिक कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. तरुण पिढीने सावरकरांचे विचार आत्मसात करून राष्ट्रहितासाठी कार्य करावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. हिंदू जनजागृती, संघटन आणि हिंदू समाजाने लोकसंख्या वाढीबाबत सजग राहण्याच्या गरजेवर मार्गदर्शन करत मिलिंद एकबोटे म्हणाले की, हिंदूंनी सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक स्तरावर एकत्र येत भविष्यातील पिढ्यांसाठी जागरूक राहणे आवश्यक आहे. त्यांच्या मार्गदर्शनास उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी स्वातंत्र्यवीर सावरकर फाउंडेशनच्या वतीने महत्त्वपूर्ण भूमिका मांडण्यात आली. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान ‘भारतरत्न’ प्रदान करण्यात यावा, यासाठी मिलिंद एकबोटे यांच्या नेतृत्वाखाली भारत सरकार तसेच महाराष्ट्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले.

पुढील वर्षी ‘भारतरत्न स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर’ या नावाने तात्यारावांचा गौरवपूर्ण उल्लेख करण्याचा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला. उपस्थित सावरकरप्रेमींनी या भूमिकेला उत्स्फूर्त समर्थन दर्शविले.

## होम्बळे फिल्म्सचे मराठी प्रेक्षकांना खास सरप्राईज

पुणे (दै. संध्या)

■ पहिली मराठी हिप-हॉप म्युझिकल फिल्म जाहीर!

■ KGF आणि Kantara चे मेकर्स आता मराठी हिप-हॉपच्या दुनियेत

■ ‘येतो का नाय - पहिला वार’चा बिग अनाउन्समेंट!




गेल्या काही वर्षांत भारतीय सिनेमाला अनेक ब्लॉकबस्टर चित्रपट देणारे देशातील प्रसिद्ध प्रॉडक्शन हाऊस ‘होम्बळे फिल्म्स’ आता एका नव्या धमाक्यासाठी सज्ज झाले आहे. निर्मात्यांनी अधिकृतपणे आपल्या पहिल्या हिप-हॉप म्युझिकल स्टोरी ‘येतो का नाय’ची घोषणा केली आहे. विविध संस्कृती आणि भाषांमध्ये आपल्या कथांचा विस्तार करताना, प्रॉडक्शन हाऊसने या चित्रपटाच्या हिंदी आवृत्ती “YKN - पहिला वार”ची देखील घोषणा केली आहे. युवांच्या संस्कृती, रिदम, भावना आणि वास्तवाने भरलेली ही एक ताजी आणि ऊर्जेने परिपूर्ण म्युझिकल जर्नी आहे, ज्याची कथा स्वप्नांच्या शहर मुंबईच्या पार्श्वभूमीवर आधारित आहे.

वेगवेगळ्या फिल्म इंडस्ट्रींमध्ये सातत्याने यश मिळवत असलेल्या ‘होम्बळे फिल्म्स’ने भारतातील आघाडीच्या कंटेंट-ड्रिव्हन प्रॉडक्शन बॅनर्समध्ये स्वतःची मजबूत ओळख निर्माण केली आहे. प्रादेशिक कथा त्यांच्या भावनिक आणि सांस्कृतिक मुळांसह मोठ्या सिनेमॅटिक स्तरावर मांडण्यासाठी हे बॅनर ओळखले जाते.

विजय किरगंदूर निर्मित ‘येतो का नाय’ (YETO KA NAAY) चे दिग्दर्शन सारंग संजीव साठे करत आहेत. या चित्रपटाची कथा सारंग संजीव साठे, सुजॉय जाधव, सृष्टी तावडे आणि श्रेयस सगवेकर यांनी एकत्र लिहिली आहे. चित्रपटाचे सिनेमॅटोग्राफी हर्षवीर ओबेरॉय यांनी सांभाळले आहे, तर संगीत एवी प्रफुल्लचंद्र यांनी दिले आहे. सध्या या चित्रपटाचे शूटिंग मुंबईमध्ये सुरू असून, याच वर्षी हा चित्रपट चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

मराठी हिप-हॉप संस्कृतीच्या भन्नाट वाइबसह युवांच्या भावना, मैत्री, प्रेम, ओळख आणि स्वतःला शोधण्याच्या प्रवासाला उलगडणारा ‘येतो का नाय’ हा होम्बळे फिल्म्ससाठी एक महत्त्वाचा अध्याय ठरणार आहे. याच्या माध्यमातून प्रॉडक्शन हाऊस भारताच्या विविध भागांतील वेगळ्या कथा आणि आवाज जगासमोर आणण्याच्या आपल्या प्रयत्नांना पुढे नेत आहे.

होम्बळे फिल्म्स हे “के.जी.एफ.: चैप्टर १ ’, ‘कांतारा ’, 'सालार: पार्ट १ - सीजफायर’ आणि महावतार नरसिंह सारख्या ब्लॉकबस्टर फ्रँचायझी देणारे एक प्रभावी प्रॉडक्शन बॅनर आहे. आपल्या मोठ्या पॅन-इंडिया चित्रपटांद्वारे या प्रॉडक्शन हाऊसने भारतीय सिनेमाचा चेहरामोहरा बदलला असून बॉक्स ऑफिसवर मोठे योगदान दिले आहे. ‘महावतार नरसिंह’सारख्या चित्रपटाद्वारे त्यांनी भारतीय संस्कृतीची मुळे जपत देशातील उत्कृष्ट ॲनिमेटेड चित्रपटांपैकी एक सादर केला, ज्यामुळे भारतीय ॲनिमेशनला नवी उंची मिळाली. गेल्या काही वर्षांत कंपनीने तेलुगू आणि मल्याळम सिनेमासह इतर भारतीय फिल्म इंडस्ट्रींमध्येही आपली मजबूत पकड निर्माण केली आहे.

## हृदय शस्त्रक्रियेदरम्यान आलेल्या स्ट्रोक संकटावर यशस्वी मात

पुणे (दै. संध्या)



■ बहुविशेषज्ञांच्या तातडीच्या समन्वयातून ३५ वर्षीय तरुणाला नवजीवन

मेडिकव्हर हॉस्पिटल पुणे येथील डॉक्टरांनी अत्यंत गुंतागुंतीच्या आणि जीवघेण्या परिस्थितीत ३५ वर्षीय तरुणाचे प्राण वाचवत आधुनिक वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी केली आहे. “कोआर्क्टेशन ऑफ एओर्टा” (Coarctation of Aorta - CoA) या जन्मजात हृदयविकारामुळे त्रस्त असलेल्या रुग्णावर यशस्वी उपचार करताना शस्त्रक्रियेदरम्यान अचानक उद्भवलेल्या स्ट्रोकच्या गंभीर संकटावरही डॉक्टरांनी तातडीने मात केली. रुग्णाला अनेक वर्षांपासून उच्च रक्तदाबाचा त्रास होता. तरुण वयात दीर्घकाळ उच्च रक्तदाब असणे हे अनेकदा गंभीर हृदयविकाराचे लक्षण असू शकते. सखोल तपासण्या आणि अत्याधुनिक इमेजिंग चाचण्यांनंतर रुग्णाला “कोआर्क्टेशन ऑफ एओर्टा” हा जन्मजात विकार असल्याचे निदान झाले. या विकारामध्ये शरीरातील मुख्य रक्तवाहिनी म्हणजे महाधमनी (Aorta) अरुंद होते किंवा त्यामध्ये अडथळा निर्माण होतो. त्यामुळे हृदयाला संपूर्ण शरीरात रक्तपुरवठा करण्यासाठी अधिक ताकदीने कार्य करावे लागते. सामान्यतः हा विकार लहानपणीच निदान होऊन त्यावर उपचार केले जातात. मात्र उपचार न झाल्यास प्रौढ वयात हृदयविकार, ॲन्युरिझम, कोरोनरी आर्टरी डिसीज किंवा हृदय निकामी होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे या रुग्णावर तातडीने उपचार करणे आवश्यक होते.

# आकाश एज्युकेशनलचे विद्यार्थी बालवैज्ञानिक स्पर्धेत चमकले

**प्रतिष्ठित विज्ञान प्रतिभा स्पर्धेत विद्यार्थ्यांनी रौप्य आणि कांस्य पदके पटकावली**

पुणे (दै. संध्या)

परीक्षा तयारी सेवांमधील राष्ट्रीय स्तरावरील अग्रणी असलेल्या आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेडने (AESL), ग्रेटर बॉम्बे सायन्स टीचर्स असोसिएशन (GBSTA) द्वारे आयोजित प्रतिष्ठित डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा (DHBBVC) 2025-26 मध्ये आपल्या विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट कामगिरीची अभिमानाने घोषणा केली. महाराष्ट्र (यूएस)/ होमी भाभा शैक्षणिक विज्ञान स्पर्धेच्या निकालांच्या आधारे, पुणे आणि कोथरूड येथील आकाश केंद्रांकडून मिळणाऱ्या सन्मानांमुळे उद्याची वैज्ञानिक दृष्टी घडवण्याची गौरवशाली परंपरा कायम आहे.

ही स्पर्धा महाराष्ट्रातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी विज्ञान क्षेत्रातील प्रतिभा ओळखणाऱ्या प्रमुख स्पर्धांपैकी एक आहे. दरवर्षी, डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा चार कठोर टप्प्यांमधून विद्यार्थ्यांची ओळख करून त्यांना सन्मानित करते. सैद्धांतिक परीक्षा, प्रात्यक्षिक मूल्यांकन, मुलाखती आणि प्रकल्प. या टप्प्यांमुळे विज्ञानाची आवड असलेल्या तरुण प्रतिभेला विविध मार्गांनी स्वतःला सिद्ध करण्याची संधी मिळते. यावर्षी, आकाश कोथरूड येथील नववी इयत्तेतील विद्यार्थी सूर्यांशू जावळे याला स्पर्धेच्या परीक्षण निकषांमधील उत्कृष्टतेसाठी रौप्य पदक प्रदान करण्यात आले, तर पुणे पीसीएमसीमध्ये शिकत असलेल्या अथर्व सूर्यवंशी या नववीच्याच विद्यार्थ्याने कांस्य पदक पटकावले. या दोन्ही यशांमधून विज्ञानाच्या तांत्रिक क्षेत्रात शैक्षणिक बांधिलकीची उच्च पातळी आणि व्यावहारिक उपयोगाद्वारे मिळवलेले यश दिसून येते.

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन करताना, आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड (AESL) चे मुख्य शैक्षणिक आणि व्यवसाय प्रमुख (पश्चिम), डॉ. एच. आर. राव म्हणाले, "सूर्यांशू आणि अथर्व यांचे यश त्यांचे समर्पण, कठोर परिश्रम आणि विज्ञानावरील प्रेम दर्शवते. डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेसारख्या विज्ञान स्पर्धा लहान मुलांना नवीन कल्पना आणि मूल्यांकनाच्या पद्धती शोधण्यासाठी प्रोत्साहित करून विज्ञानातील सर्जनशीलता आणि चिकित्सक विचार कौशल्ये विकसित करतात. आकाश विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी तसेच त्यांची सर्जनशीलता विकसित करण्यासाठी आवश्यक साधनांसह एक पोषक वातावरण प्रदान करते."




डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा इयत्ता सहावी आणि नववीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करते, आणि ही स्पर्धा इंग्रजी व मराठी या दोन्ही माध्यमांमध्ये घेतली जाते. यामध्ये चार टप्पे आहेत - सैद्धांतिक स्पर्धा, प्रात्यक्षिक स्पर्धा, सर्वसाधारण मुलाखत, आणि कृती संशोधन प्रकल्पावर आधारित मूल्यमापन व मुलाखत. या स्पर्धेचा उद्देश वैज्ञानिक तत्त्वांचे आकलन, तर्क, सहसंबंध आणि उपयोजन यांना प्रोत्साहन देणे हा आहे. यातील प्रश्न प्रामुख्याने महाराष्ट्र राज्य बोर्डाच्या विज्ञान पाठ्यपुस्तकांमधून, तसेच ICSE, IB आणि CBSE च्या विज्ञान पाठ्यपुस्तकांमधील आशयातून घेतले जातात.


## थोडक्यात पण महत्वाचे...



## पुणे, पिंपरी-चिंचवड विषारी दारू प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आदेश

मुंबई (दैनिक संध्या) : पुणे शहरातील हडपसर आणि पिंपरी-चिंचवडमधील दापोडी-फुगेवाडी परिसरात विषारी दारू प्यायल्याने १२ नागरिकांचा मृत्यू झाल्याची घटना अत्यंत दुर्दैवी असून, या प्रकरणातील दोषींची गय केली जाणार नाही, असे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी स्पष्ट केले आहे. या प्रकरणाच्या मुळाशी जाऊन सखोल चौकशी करण्याचे आदेश त्यांनी प्रशासनाला दिले आहेत. या घटनेची गंभीर दखल घेत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी पुणे व पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी आणि स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधला.या दुर्घटनेच्या मुळाशी जाऊन तपास करा आणि अशा बेकायदेशीर कृत्यांमध्ये सहभागी असलेल्या सर्वांवर कठोर कारवाई करावी,अशा स्पष्ट सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. आतापर्यंत या प्रकरणात ८ जणांना अटक करण्यात आली आहे. पोलीस आणि उत्पादन शुल्क विभागाकडून संयुक्तपणे तपास सुरू असून, या विषारी दारूचा पुरवठा कोठून झाला आणि यात कोणाचा सहभाग आहे, याचा शोध घेतला जात आहे,अशी माहितीही उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिली.

## संघ तेव्हा मजबूत असता, तर देशाची फाळणी झालीच नसती : सुनिल आंबेकर



नागपूर (दैनिक संध्या) : आपल्या देशाची झालेली फाळणी ही मागील शतकातील सर्वात वेदनादायी बाब होती. देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा संघ आजच्या इतका मजबूत नव्हता. जर संघ मजबूत असता तर कधीच फाळणी झाली नसती, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनिल आंबेकर यांनी केले. नागपुरात शुक्रवारी आयोजित पत्रकार संगोष्टीदरम्यान ते बोलत होते. सिव्हील लाईन्स येथील चिटणवीस केंद्र येथे झालेल्या कार्यक्रमाला विदर्भ प्रांत संघचालक दीपक तामशेट्टीवार, नागपूर महानगर संघचालक राजेश लोया प्रामुख्याने उपस्थित होते. १९४७ मध्ये संघ हवा तितका मजबूत नव्हता. मात्र तरीदेखील हिंदूचे संरक्षण, त्यांचे पुनर्वसन यासाठी संघाने पूर्ण ताकदीने प्रयत्न केले होते. फाळणीमुळे तत्कालिन यंत्रणेविरोधात लोकांमध्ये प्रचंड रोष होता. त्यामुळेच ते स्वातंत्र्यलढ्याचे 'हिरो' होते त्यांची फाळणीनंतर नकारात्मक प्रतिमा निर्माण झाली होती. त्यावेळी काही राजकीय पक्ष संघाला राजकीय स्पर्धक समजू लागले होते. त्यावेळी संघाचे रेकॉर्ड गोळा करण्याचे अनेक मुख्यमंत्र्यांना आदेश देण्यात आले होते व संघावर राजकीय कारणांमुळेच पहिली बंदी लावण्यात आली होती, असा दावा आंबेकर यांनी केला. राजकीय स्वार्थातून अनेकदा संघाबाबत विविध अपप्रचार करण्यात येतो. मात्र प्रत्यक्षात संघाकडून कुणाचाही द्वेष करण्यात येत नाही व कुणाशीही शत्रुत्व वगैरेदेखील नाही. संघ सर्वांनाच आपले मानतो व समाजातील सर्वच तत्वांशी संवाद प्रस्थापित करण्याची भावना आहे. त्यामुळेच संघ सर्वांशी संवाद व चर्चेसाठी कामय तयार असतो, असेदेखील आंबेकर म्हणाले.

## उन्हाचा तडाखा आणि वाढते वीजबिल; असे करा नियंत्रित !

गोंदिया (दैनिक संध्या) : उन्हाळ्याची तीव्रता शिगेला पोहोचली असून, तापमान अनेकदा ४५ अंशांच्या पुढे जात आहे. उकाड्यापासून बचाव करण्यासाठी नागरिकांना एसी, कूलर, पंखे, रेफ्रिजरेटर यांसारख्या विद्युत उपकरणांचा अधिक वापर करावा लागत आहे. त्यामुळे विजेचा वापर वाढून महिनाअखेरीस मोठ्या वीजबिलाचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर महावितरणने 'ऊर्जेची बचत हीच ऊर्जा निर्मिती' हा संदेश देत काही महत्त्वाच्या सूचना जारी केल्या आहेत. या सोप्या सवयी उन्हाळ्याची तीव्रता शिगेला आणि उपायांचा अवलंब केल्यास घर थंड राहण्यास मदत होईल, वीजबिल नियंत्रणात राहील आणि संभाव्य दुर्घटनांपासूनही बचाव होऊ शकेल, असा दावा करण्यात आला आहे. घर लवकर थंड व्हावे म्हणून अनेकजण एसी १६ किंवा १८ डिग्रीवर चालवितात. त्यामुळे एसीच्या कॉम्प्रेसरवर अधिक ताण येतो आणि विजेचा वापरही वाढतो. अभ्यासानुसार एसी २४ डिग्रीवर ठेवल्यास योग्य थंडावा मिळतो आणि वीज बचतही होते. एसीसोबत पंख्याचा वापर केल्यास थंड हवा सर्वत्र पसरते आणि लोडही कमी होतो. तसेच एसीचे फिल्टर दर १५ दिवसांनी स्वच्छ करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे. जुनी किंवा कमी क्षमतेची वायरिंग असल्यास वायर गरम होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे विजेचा अपव्यय होतो तसेच शॉर्टसर्किटची शक्यताही निर्माण होते. त्यामुळे परवानाधारक इलेक्ट्रिशियनकडून नियमित वायरिंग तपासणी करून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अर्थिंग व्यवस्थित नसल्यास कूलर किंवा फ्रीजला हात लावताना हलका विद्युत थक्का बसू शकतो.

# एशियन पेंट्सचे एस आणि ट्रॅक्टर इमल्शन अँटी-डॅंप तंत्रज्ञानासह सादर

नवी दिल्ली (दै. संध्या) :

आजच्या घरमालकांना केवळ सुंदरच दिसणारी नाहीत तर आरामदायकही वाटणारी आणि वर्षानुवर्षे टिकणारी घरे आवडतात. परंतु, किफायती पेंट प्रकारांत, दिसण्यास आकर्षक, उत्तम कामगिरी आणि परवडणारी किंमत या तिन्ही गोष्टी एकत्र देणारी उत्पादने शोधणे मात्र अनेकदा कठीण असते. सर्वसामान्य चिंतांपैकी एक म्हणजे भिंतींवरील पाण्याचे डाग, ही एक अशी समस्या आहे जी अन्यथा चांगल्या प्रकारे जोपासलेल्या घराचे सौंदर्य नकळतपणे कमी करू शकते. ही गरज लक्षात घेऊन, एशियन पेंट्सने आपल्या लोकप्रिय एस आणि ट्रॅक्टर इमल्शन्समध्ये अँटी-डॅम्प म्हणजेच आर्द्रता विरोधी तंत्रज्ञान सादर केले आहे. याबरोबरच, ही उत्पादने कामगिरीच्या महत्त्वाच्या पैलूंवर 4 वर्षांची वॉरंटी देतात, ज्यामुळे दीर्घकाळ टिकणारी कामगिरी




आणि मूल्य एकाच उत्पादनात जुळून मिळतात. एशियन पेंट्सचे दोन सर्वात विश्वासार्ह आणि मोठ्या प्रमाणावर वापरले जाणारे ब्रँड्स, एस (Ace) आणि ट्रॅक्टर (Tractor) इमल्शन्स, यांनी किफायती प्रकारात विश्वसनीय दर्जा आणि मूल्य उपलब्ध करून घरमालक, डीलर्स आणि कंत्राटदारांचा विश्वास जिंकला आहे. ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी पोर्टफोलिओमध्ये नवनवीन शोध सातत्याने सादर करणे चालू आहे. यामध्ये अधिक चांगले मूल्य देणारी ट्रॅक्टर अॅन्ड एस स्पार्क (ACE Sparc) श्रेणी आणि घरांसाठी एक चमकदार फिनिश देणारी ट्रॅक्टर अॅन्ड एस शाइन (Ace Shine) श्रेणी समाविष्ट आहे.~

आर्द्रता-विरोधी तंत्रज्ञान (Anti-Damp Technology) सादर करत, एशियन पेंट्सने घरमालकांना भेडसावणाऱ्या सर्वात सामान्य आव्हानांपैकी एकावर तोडगा शोधून हा वारसा पुढे नेला आहे. हे नवीन तंत्रज्ञान भिंतींवर पाण्याचे डाग पडण्यापासून रोखण्यास मदत करते, ज्यामुळे एक सहज दिसणारा आणि आश्वासक फायदा मिळतो. या नावीन्यपूर्ण शोधाद्वारे, कंपनीचा उद्देश किफायती पेंट प्रकाराचा वापर करणाऱ्या ग्राहकांना दीर्घकाळ टिकणारी कामगिरी आणि अधिक मनःशांती देणे हा आहे.

ही अंतर्दृष्टी सोप्या आणि त्यांना सहज समजेल अशा पद्धतीने पोहोचवण्यासाठी, ब्रँडने घरमालकांच्या एका सामान्य समस्येवर प्रकाश टाकण्याकरिता विनोदाचा वापर करून एक नवीन मोहीम सुरू केली आहे. प्रख्यात अभिनेते गजराज राव आणि बृजेंद्र कला यांच्या अभिनयाने सजलेल्या या चित्रपटात, एक घरमालक पाहुण्यांचे आदरातिथ्य करत असतो, पण तिथे एका अनपेक्षित उपस्थितीमुळे त्यांच्या कामात वारंवार व्यत्यय येतो - ती म्हणजे पाण्याचा डाग, ज्याला एका खोडकर पात्राच्या रूपात सजीव आहे. घरमालक शांत राहण्याचा प्रयत्न करत असताना, तो पाण्याचा डाग अगदी गैरसोयीच्या क्षणी पुन्हा पुन्हा समोर येतो, ज्यामुळे अनेक विनोदी पण तरीही आपल्याशी जुळणाऱ्या प्रसंगांची मालिका निर्माण होते. दमट भिंती सुकल्यानंतर दिसणाऱ्या पाण्याच्या डागांमुळे होणारा दैनंदिन त्रास या कथानकात छान दाखवला आहे, तसेच आर्द्रता-विरोधी तंत्रज्ञान अशा समस्या टाळण्यास कसे मदत करते, हे देखील अधोरेखित केले आहे.

एशियन पेंट्स लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, अमित सिंगले म्हणाले, "संपूर्ण भारतात, ग्राहकांच्या अपेक्षांमध्ये आम्हाला एक स्पष्ट बदल दिसून येत आहे, जिथे किंमत काहीही असो, कामगिरी आणि सौंदर्य या दोन्हीं समान महत्त्वाच्या आहेत. एशियन पेंट्समध्ये, आम्ही ग्राहकांच्या या गरजा सतत समजून घेतल्या आहेत आणि संपूर्ण भारतातील अधिकाधिक घरांसाठी नाविन्यपूर्ण उपाय उपलब्ध करून देत आहोत. या श्रेणीतील आमच्या उत्पादनांना कामगिरीच्या मुख्य वैशिष्ट्यांवर 4 वर्षांची वॉरंटी दिली जाते, ज्यामुळे ग्राहकांना अधिक विश्वासार्हता आणि दीर्घकाळ टिकणारे मूल्य मिळते. ट्रॅक्टर आणि एस इमल्शन्समध्ये अँटी-डॅम्प टेक्नॉलॉजीचा समावेश ही वचनबद्धता आणखी पुढे नेत किफायतशीर श्रेणीतील घरांना पाण्याच्या डागांशी संबंधित समस्यांपासून विश्वसनीय संरक्षण मिळते आणि प्रत्येक भारतीय घरासाठी अर्थपूर्ण आणि नवनव्या संशोधनांची उपलब्धता वाढते."

या उत्पादनाच्या लाँचद्वारे, ग्राहक किफायतशीर पेंटकडून काय अपेक्षा करू शकतात हे एशियन पेंट्स पुन्हा एकदा दाखवून देत आहे - ज्यात परवडणारी किंमत, उत्तम कार्यक्षमता आणि नावीन्य यांचा संगम साधला आहे.

## कांजुर डम्पिंग ग्राऊंड जागतीक प्रदुषणात १२ व्या स्थानावर

मुंबई (दै. संध्या) :

मुंबईतील कांजूरमार्ग डम्पिंग ग्राऊंडने आता जागतिक स्तरावरही मुंबईची बदनामी केली आहे. युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, लॉस एंजेलिस (UCLA) यांच्या २०२६ च्या STOP Methane Project अहवालानुसार कांजूरमार्ग लँडफिलला जगातील सर्वाधिक प्रदूषित लँडफिल्समध्ये १२वा क्रमांक मिळाला आहे. दर तासाला तब्बल ४.९ टन मिथेन वायूची गळती होत असल्याचे या अहवालात स्पष्ट झाले असून, हे प्रदूषण जवळपास दहा लाख SUV वाहनांच्या प्रदूषणाइतके धोकादायक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र इतक्या गंभीर परिस्थितीनंतरही मुंबई महापालिका आणि राज्य सरकार केवळ आश्वासनांची धूळफेक करत असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. कांजूर डम्पिंग ग्राऊंडमुळे कांजूरमार्ग, भांडुप, मुलुंड, विक्रोळी परिसरातील लाखो नागरिकांचे जीवन अक्षरशः नरकयातना बनले आहे. दुर्गंधी, प्रदूषित हवा, वारंवार लागणाऱ्या आगी व मिथेन वायूच्या वाढत्या प्रमाणामुळे नागरिकांना श्वसनाचे विकार, त्वचारोग, फुफ्फुसांचे आजार, दमा, अॅलर्जी यांसारख्या गंभीर आजारांनी ग्रासले आहे. विशेषतः लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांचे आरोग्य सर्वाधिक धोक्यात आले आहे. अनेक नागरिकांचे आयुमान कमी होत असल्याची भीती स्थानिकांकडून व्यक्त केली जात आहे. मुंबईतील जवळपास ९० टक्के घनकचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या या कचराभूमीबाबत पालिका प्रशासनाची भूमिका मात्र पूर्णपणे बेजबाबदार असल्याचा आरोप होत आहे. उपाययोजना सुरू आहेत, वृक्षलागवड केली जाईल, पर्यायी जागेचा शोध सुरू आहे अशी केवळ कागदी घोषणा करण्यात येत असताना प्रत्यक्षात परिस्थिती दिवसेंदिवस अधिकच गंभीर होत चालली आहे. १८५ लाख मेट्रिक टनांहून अधिक जुना कचरा या परिसरात साचलेला असून, त्यातून होणारे मिथेन उत्सर्जन थांबविण्यासाठी कोणतीही ठोस व प्रभावी कृती करण्यात आलेली नाही.

## आयओसीकडून पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा सुरळीत पुरवठा सुरू

### नागरिकांना घाबरून अतिरिक्त खरेदी न करण्याचे आवाहन

मुंबई (दै. संध्या) :

देशातील विविध भागांमध्ये इंधनाच्या मागणीत लक्षणीय वाढ होत असतानाही इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड (आयओसी) पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा सुरळीत व अखंड पुरवठा सुनिश्चित करत असल्याची माहिती कंपनीने दिली आहे. वाढलेल्या मागणीच्या पार्श्वभूमीवर कंपनीने आपल्या पुरवठा साखळी, वाहतूक व्यवस्था आणि वितरण यंत्रणा अधिक सक्षम करत देशभरात इंधन उपलब्धता कायम ठेवली आहे. आयओसीच्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रात 1 ते 28 मे 2026 या कालावधीत डिझेलच्या विक्रीत मागील वर्षाच्या तुलनेत तब्बल 31.5 टक्क्यांची वाढ नोंदविण्यात आली आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये विक्रीत मोठी वाढ झाली असून बीडमध्ये 67.3 टक्के, अहमदनगरमध्ये 61.2 टक्के, सांगलीमध्ये 53 टक्के, उस्मानाबादमध्ये 52.7 टक्के, अकोला आणि नांदेडमध्ये




प्रत्येकी 51.6 टक्के वाढ झाली आहे. पुणे जिल्ह्यातही डिझेल विक्रीत 20.1 टक्क्यांची वाढ नोंदविण्यात आली आहे.

कंपनीच्या मते, ग्रामीण भागातील हंगामी नांगरणी, कापणी आणि कृषी कामांमुळे इंधनाची मागणी वाढली आहे. तसेच सार्वजनिक क्षेत्रातील इंधन विक्रेत्यांच्या तुलनेत इतर पुरवठादारांच्या किंमतींमधील फरकामुळे ग्राहकांचा कल आयओसीच्या इंधन केंद्रांकडे वाढला आहे. याशिवाय, अनेक संस्थात्मक आणि व्यावसायिक ग्राहकांनी रिटेल इंधन केंद्रांकडे वळल्याने अतिरिक्त मागणी निर्माण झाली आहे.

इंडियनऑइलने आपल्या देशव्यापी टर्मिनल्स, डेपो, पाइपलाईन्स, एलपीजी बॉटलिंग प्रकल्प आणि रिटेल इंधन केंद्रांच्या विस्तृत नेटवर्कच्या माध्यमातून पुरवठा अखंड ठेवला आहे. कंपनीची पुरवठा पथके, वाहतूक व्यवस्था, टर्मिनल ऑपरेशन्स आणि निवडक रिटेल केंद्रे चोवीस तास कार्यरत असून उत्पादनांची वेळेवर वाहतूक आणि पुनर्भरण सुनिश्चित केले जात आहे. तसेच राज्य प्रशासनाशी समन्वय साधून पुरवठा व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यात आले आहे.

- महाराष्ट्रात डिझेल विक्रीत 31.5% वाढ
- बीड, अहमदनगर, सांगली, उस्मानाबाद, अकोला आणि नांदेडमध्ये सर्वाधिक वाढ
- कृषी हंगाम आणि ग्राहकांचा सार्वजनिक क्षेत्रातील इंधन केंद्रांकडे वाढता कल हे प्रमुख कारण
- पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा पुरेसा साठा उपलब्ध
- नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आणि अतिरिक्त खरेदी टाळण्याचे आवाहन

दरम्यान, देशभरात पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे स्पष्ट करत आयओसीने नागरिकांना कोणतीही अफवा किंवा चुकीची माहिती यावर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे. इंधन उपलब्धतेबाबतची माहिती केवळ अधिकृत स्रोतांकडूनच घ्यावी तसेच घाबरून जाऊन अतिरिक्त खरेदी टाळावी, असेही कंपनीने म्हटले आहे.

## प्लॅटिनमआरएक्सने १० लाख युजर्सचा टप्पा पार केला, भारतीयांच्या औषधांच्या खर्चात १२८ कोटी रुपयांहून अधिक बचत केली

नवी दिल्ली (दै. संध्या) :

परवडणाऱ्या ब्रँडेड-जेनेरिक औषधे उपलब्ध करून देणाऱ्या भारतातील सर्वात विश्वासार्ह प्लॅटफॉर्म असलेल्या प्लॅटिनमआरएक्सने मोठा टप्पा गाठला असून देशभरातील 10 लाखांहून अधिक रुग्णांना आपली सेवा दिली आहे. दर्जेदार जेनेरिक पर्याय उपलब्ध करून देत कंपनीने ग्राहकांच्या औषध खर्चात एकूण 128 कोटी रुपयांपेक्षा जास्त बचत केली आहे. मधुमेह, उच्च रक्तदाब आणि हृदयविकारासारख्या आजारांमुळे लाखो भारतीयांना दरमहा 2,000 ते 5,000 रुपयांपर्यंत औषधांवर खर्च करावा लागतो. या वाढत्या खर्चामुळे 70 कोटींहून अधिक लोक औषधांचे




डोस चुकवतात, औषधे पुन्हा घेण्यास उशीर करतात किंवा उपचार अर्धवट सोडतात. ही परिस्थिती बदलण्यासाठी प्लॅटिनमआरएक्सची सुरुवात करण्यात आली. हा प्लॅटफॉर्म प्रत्येक औषधासाठी एक काळजीपूर्वक निवडलेला आणि उच्च दर्जाचा ब्रँडेड जेनेरिक पर्याय उपलब्ध करून देतो. ही औषधे नामांकित फार्मा कंपन्यांकडून थेट घेतली जातात आणि त्यामध्ये मूळ ब्रँडेड औषधांप्रमाणेच 100 टक्के समान सॉल्ट कॉम्पोझिशन असते. परवानाधारक फार्मासिस्टमार्फत औषधे दिली जातात आणि भारतातील 20 हजारांहून अधिक पिनकोडपर्यंत डिलिव्हरी केली जाते. मोठ्या शहरांमध्ये एका दिवसात, तर इतर भागांत 1 ते 3 दिवसांत औषधे पोहोचवली जातात. या प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून रुग्ण गुणवत्ता आणि सुरक्षिततेत कोणतीही तडजोड न करता दर महिन्याला औषधांच्या खर्चात 50 ते 60 टक्के बचत करू शकतात. आशुतोष पांडे, सह-संस्थापक, प्लॅटिनमआरएक्स म्हणाले, "भारतीय रुग्णांचे 128 कोटी रुपये वाचणे हे आमच्यासाठी केवळ आकडेवारी नाही, हे ते पैसे आहेत जे आता कुटुंबांच्या दैनंदिन गरजांसाठी, मुलांच्या शिक्षणासाठी आणि घरखर्चासाठी वापरले जात आहेत. औषधांच्या वाढत्या खर्चामुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक ताण येतो आणि अनेकदा या गरजा मागे पडतात. आमचा विश्वास आहे की चांगल्या दर्जाची औषधे ही लक्झरी असू नयेत, प्रत्येकाला परवडणाऱ्या किमतीत मिळायला हवीत. आज जवळपास 10 लाख कुटुंबांपर्यंत पोहोचल्यानंतर हा विचार मोठ्या बदलाचे रूप घेत आहे." जेनेरिक औषधांच्या बाजारात प्लॅटिनमआरएक्सने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. याची सर्वात मोठी खासियत म्हणजे सोपी आणि विश्वासार्ह व्यवस्था. हे प्लॅटफॉर्म रुग्णांना अनेक पर्याय देऊन गोंधळात टाकत नाही, तर प्रत्येक सॉल्टसाठी फक्त एकच विश्वासार्ह आणि तपासलेला ब्रँडेड जेनेरिक पर्याय उपलब्ध करून देते. त्यामुळे रुग्णांचा विश्वास वाढतो आणि डॉक्टरांनी दिलेल्या महागड्या ब्रँडेड औषधांऐवजी कमी किमतीच्या ब्रँडेड-जेनेरिक औषधांकडे वळणे सोपे होते.

प्लॅटिनमआरएक्सची स्थापना आशुतोष पांडे आणि पियुष कुमार यांनी केली. हे दोघेही अनुक्रमे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी दिल्ली आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट कोलकाता येथील माजी विद्यार्थी आहेत.

भारतात परवडणारी औषधे उपलब्ध असली तरी लोकांमध्ये विश्वास आणि योग्य माहितीची कमतरता आहे, या विचारातून त्यांनी कंपनी सुरू केली. रुग्णांमध्ये ब्रँडेड जेनेरिक औषधांचा वापर 2024 मध्ये 22 टक्के होता, तो 2025 मध्ये जवळपास दुपटीने वाढून 40 टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे.

# प्रत्येक घुसखोराला शोधून देशाबाहेर काढणार : अमित शहा

नवी दिल्ली (दै. संध्या) :

देशाच्या राजकारणात असे काही क्षण येतात, जेव्हा जनतेला स्पष्टपणे दिसते की सरकार केवळ घोषणा करत नाही, तर प्रत्यक्षात बदल घडवत आहे. आजचा भारतही तसाच दिसतो, जिथे एकीकडे सीमा सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले जात आहे, तर दुसरीकडे देशभरात विकास आणि राष्ट्रवादाचे एक नवीन मॉडेल प्रस्थापित केले जात आहे.

अलीकडेच देशाच्या राजकीय परिस्थितीत एक ऐतिहासिक पाऊल उचलण्यात आले आहे, ज्यामुळे 'राष्ट्र प्रथम' या भावनेला अधिक बळकटी मिळाली आहे. खरे तर, मोदी सरकारने देशातून प्रत्येक घुसखोराला निवडकपणे बाहेर काढण्यासाठी डेमोग्राफिक



बदलांवर एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. या कठोर आणि ठोस निर्णयामागे जनतेचे प्रिय आणि अंत्योदयाचे राजकारण करणाऱ्या शाह यांचा दृढ निश्चय स्पष्टपणे दिसून येतो.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आणि आधुनिक भारताचे शिल्पकार अमित शाह यांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली, देशाची लोकसंख्याशास्त्रीय रचना बिघडवू पाहणाऱ्यांना आज एक कडक संदेश देण्यात आला आहे. ज्या भागांमध्ये बेकायदेशीर घुसखोरीमुळे लोकसंख्येचे संतुलन बिघडण्याची दीर्घकाळापासून चिंता व्यक्त केली जात आहे, त्या भागांचा ही उच्चस्तरीय समिती सखोल अभ्यास करेल. जनतेला हा संदेश स्पष्टपणे देण्यात आला आहे की आता देशाच्या सीमा फक्त नकाशावरच नाहीत, तर धोरणे आणि ठाम निर्णयांमुळेही सुरक्षित राहतील.

देशाच्या पूर्व ते पश्चिम आणि उत्तर ते दक्षिण भागात आज एक अनोखा सांस्कृतिक पुनरुत्थान पाहायला मिळत आहे. हे अनुभवताना अभिमान वाटतो की, नरेंद्र मोदीं यांच्या नेतृत्वाखाली गंगोत्रीपासून गंगासागरपर्यंत संपूर्ण गंगा मार्गावर भगवा झेंडा फडकत आहे. राजकारणाचे चाणक्य म्हणून ओळखले जाणारे अमित शाह यांच्या दूरदर्शी धोरणामुळे आणि मोदीजींच्या अफाट नेतृत्वामुळे आज संपूर्ण गंगा पट्टी सनातन संस्कृती आणि राष्ट्रवादाच्या रंगात रंगलेली दिसत आहे. 'गुजरातचा विकास मॉडेल आता देशाचा विकास मॉडेल बनला आहे, या वस्तुस्थितीचे सर्वजण साक्षीदार आहेत. शहांच्या संघटनात्मक कौशल्यामुळे एकेकाळी गुजरातमध्ये यशस्वी ठरलेले सुशासनाचे मॉडेल आज आसामपासून काश्मीरपर्यंत देशाच्या प्रत्येक भागात लागू होत आहे.

वर्षानुवर्षे देशाच्या सीमांवर राजकारण सुरू होते. विशेषतः बंगालसारख्या सीमावर्ती राज्यांमध्ये घुसखोरीला व्होट-बँक राजकारणाचा भाग बनवण्यात आले होते. पण आता परिस्थिती बदलताना दिसत आहे. शाह यांच्या नेतृत्वाखाली सुरक्षा यंत्रणांचा आत्मविश्वास वाढला आहे आणि सीमांवर पूर्वीपेक्षा अधिक कडक कारवाई केली जात आहे. याच कारणामुळे, घुसखोरांनी वेळेवर स्वतःहून परतावे आणि जे स्वतःहून परततील त्यांच्यावर खटला चालवला जाणार नाही – हा संदेश आता केवळ एक इशारा राहिलेला नाही, तर बदलत्या व्यवस्थेचे प्रतीक बनला आहे. बंगालमधील आधीच्या सरकारच्या काळात घुसखोरी मोठ्या प्रमाणात होत होती, परंतु भाजप सरकार सत्तेवर येताच घुसखोर स्वतःहून परत जाऊ लागले आहेत.

मोदी सरकारच्या 12 वर्षांच्या कार्यकाळात भाजपने देशाच्या 80% भागावर राज्य केले आहे—ही समर्थकांसाठी अभिमानाची बाब आहे, तर विरोधकांसाठी एक राजकीय आव्हान आहे. लोकांना वाटते की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकासाला राजकारणाचे केंद्र बनवले, तर आधुनिक भारताचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे अमित शाह यांनी संघटनात्मक आणि धोरणात्मक प्रयत्नांद्वारे तो देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवला.

हा बदल गंगा नदीच्या किनाऱ्यावरील शहरांमध्ये आणि गावांमध्येही जाणवत आहे. एक काळ होता जेव्हा उत्तर भारतातील राजकारण जातीय समीकरणांभोवती फिरत असे, पण आता राष्ट्रवाद आणि विकास हेच नवीन राजकीय केंद्र बनले आहेत.

सीमा सुरक्षेबाबत आणखी एक गोष्ट ज्याने सामान्य नागरिकांचे लक्ष वेधून घेतले, तो म्हणजे सीमा कुंपण लागू करण्याचा जलद निर्णय. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले काम आता विक्रमी वेळेत पूर्ण होताना दिसत आहे. एकसंध भारताचे पुरस्कर्ते शाह यांच्या कुशल समन्वयामुळे, बंगालमधील भाजप सरकारने केवळ 45 दिवसांत सीमा कुंपणासाठी जमीन देण्याचे आपले आश्वासन 7 दिवसांत पूर्ण केले.

आज, सामान्य नागरिकांना तीव्रतेने जाणवते की भारत एका निर्णायक आणि सुरक्षित टप्प्यात दाखल झाला आहे.

सुरक्षा, विकास, सांस्कृतिक अभिमान आणि मजबूत शासन या भक्कम स्तंभांवर उभारलेला हा नवा भारत आता कोणासमोर झुकणार नाही.

अंत्योदय राजकारण करणारे शाह यांची दूरदृष्टी आणि मजबूत धोरणांनी देशाची राजकीय आणि सामाजिक दिशा कायमस्वरूपी बदलून टाकली आहे, त्यामुळे येणाऱ्या पिढ्यांसाठी सुरक्षित आणि समृद्ध भविष्याची भक्कम पायाभरणी होत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### प्रा. सागर आटोळे सर यांना “महाराष्ट्राचे अनमोल रत्न” पुरस्कार

बारामती (दैनिक संध्या) : अत्यंत लोकप्रिय मराठी वृत्तवाहिनी ABP माझा प्रस्तुत प्रतिष्ठित “महाराष्ट्राचे अनमोल रत्न” पुरस्कार सोहळ्यात बारामती तालुक्यातील ज्ञानसागर गुरुकुलचे संस्थापक प्रा. सागर मानसिंग आटोळे सर यांना शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल सन्मानित करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी प्रा. सागर आटोळे सर यांनी केलेले कार्य प्रेरणादायी असून, त्यांच्या शैक्षणिक वाटचालीची दखल घेत त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री मा. उदय रविंद्र सामंत आणि सुप्रसिद्ध अभिनेत्री पूजा सावंत यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सोहळ्यात शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात आला. ज्ञानसागर गुरुकुलच्या माध्यमातून ग्रामीण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, शिस्तबद्ध शिक्षण, संस्कार, गुणवत्तापूर्ण अध्यापन आणि स्पर्धात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी प्रा. सागर आटोळे सर सातत्याने कार्यरत आहेत. त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणून मिळालेला “महाराष्ट्राचे अनमोल रत्न” पुरस्कार संपूर्ण ज्ञानसागर गुरुकुल परिवारासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. या सन्मानामुळे बारामती तालुक्यासह संपूर्ण ग्रामीण शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, विविध स्तरातून प्रा. सागर मानसिंग आटोळे सर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



### बारामती नगरपरिषदेमार्फत जनगणना 2027 कामास प्रारंभ

बारामती (दैनिक संध्या) : बारामती शहरामध्ये भारत सरकारच्या जनगणना 2027 अभियानांतर्गत कामकाजास सुरुवात करण्यात आली असून पहिल्या टप्प्यातील घरयादी तयार करण्याची कार्यवाही दिनांक 15 जून 2026 पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. या अनुषंगाने आज बारामती नगरपरिषद कार्यालय येथे प्रगणक श्री. किशोर भोसले यांनी पर्यवेक्षक श्री. अरुण थोरात यांच्या समवेत नगरपरिषदेची घरगणना केली. यावेळी बारामती नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्री. पंकज भुसे, जनगणना नोडल अधिकारी श्री. गौरव दुरुगकर तसेच तांत्रिक सहाय्यक श्री. राहुल चव्हाण उपस्थित होते. सदर जनगणना प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर मुख्याधिकारी श्री. पंकज भुसे यांनी नागरिकांनी अचूक माहिती देऊन जनगणना कार्यास सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे. जनगणना ही देशाच्या विकास नियोजनासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून नागरिकांच्या सहकार्यामुळे हे काम अधिक प्रभावीपणे पूर्ण होणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.



### स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अभिवादन

चाकण (दैनिक संध्या) : चाकण नगरपरिषदेच्या वतीने चाकण येथे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना अभिवादन करण्यात आले. चाकण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव यांच्या नेतृत्वाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे यांच्या हस्ते वीर सावरकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, नगरसेवक शशिकांत जाधव, मंगेश कांडगे, महेश शेवकरी, रूपाली कांडगे, जयश्री नायकवाडी, आरती परदेशी, हर्षद लेंडघर, स्वाती लेंडघर, सुनिता गोरे, प्रकाश राजनकर, अनिल लोहकरे आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित, मान्यवर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### टिळेकर यांना चार्टर्ड अकाउंट पदवी प्रदान

चाकण (दैनिक संध्या) : खेड तालुक्यातील भोसे येथील निशिगंधा शुभम टिळेकर यांना चार्टर्ड अकाउंट ही मानाची पदवी प्रदान करण्यात आली. येथे आयोजित करण्यात आलेल्या एका दीक्षांत समारंभात द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंट्स ऑफ इंडियाच्या वतीने निशिगंधा यांना अकाउंट्स ऑफ इंडियाचे अध्यक्ष प्रसन्न कुमार व सचिव जयकुमार बात्रा यांच्या हस्ते ही पदवी प्रदान करण्यात आली. शाल, श्रीफळ, मानचिन्ह, गौरवपत्र बहाल करून निशिगंधा यांना गौरविण्यात आले. निशिगंधा यांचे पहिली ते दहावीपर्यंतचे शालेय शिक्षण चाकण येथील विद्यानिकेतन इंग्लिश मीडियम स्कूल येथे, तर अकरावी व बारावीचे शिक्षण राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात झाले. तर वाणिज्य शाखेची पदवी चाकण शिक्षण मंडळाच्या कला व वाणिज्य महाविद्यालयातून घेतली. तसेच एमबीएचे शिक्षण आयबीएमआर महाविद्यालयात झाले. त्यानंतर त्यांनी द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंट ऑफ इंडिया येथून चार्टर्ड अकाऊंट ही पदवी मिळवली. निशिगंधा यांना ही पदवी मिळाल्याबद्दल चाकण पंचक्रोशीतून त्यांच्यावर कौतुकांचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचा चाकण भागातील विविध सेवाभावी संस्था व संघटनांच्या वतीने गौरव करण्यात आला. निशिगंधा यांनी सांगितले की," प्रयत्न, जिद्द, चिकाटी व प्रचंड आत्मविश्वासाच्या जोरावर मी हे यश मिळवले आहे. नियमित अभ्यास, वेळेचे नियोजन आणि धाडस केल्यास यश निश्चित मिळते."

# सात आरोपींसह एका विधी संघर्षित बालकाला ताब्यात

## लोणीकंद पोलिसांची अपहरण प्रकरणात अवघ्या चार तासांत थरारक कारवाई

**कोरेगावमुळ (दै. संध्या)**




लोणीकंद पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या अपहरण प्रकरणाचा अवघ्या चार तासांत छडा लावत पुणे शहर पोलिसांनी सात आरोपी व एका विधी संघर्षित बालकाला माजलगाव येथून ताब्यात घेत अपहरण करण्यात आलेल्या युवकाची सुखरुप सुटका केली. एका महिलेला जबरदस्तीने लग्न करण्यासाठी युवकाचे अपहरण केल्याचे तपासात समोर आले आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक २७ मे २०२६ रोजी रात्री ९:२९ वाजण्याच्या सुमारास पुणे शहर नियंत्रण कक्षाकडून सी.एफ. एस. क्रमांक ३६९६२६१० अन्वये लोणीकंद पोलीस ठाण्यास माहिती प्राप्त झाली. फिर्यादी अजय लक्ष्मण बोद्रे, रा. शिंदेवाडी, आष्टापूर, पुणे यांनी एच.पी. पेट्रोलपंप, शिवनेरी मिसळ समोर त्यांच्या भावास पांढऱ्या रंगाच्या इर्टिगा कारमधून जबरदस्तीने पळवून नेल्याची माहिती दिली होती. सदर माहिती मिळताच लोणीकंद पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिता रोकडे यांनी तपास पथकाला तात्काळ घटनास्थळी रवाना केले. घटनास्थळी पाहणी करून प्राथमिक चौकशी केली असता, निलेश लक्ष्मण बोद्रे (वय २९, रा. शिंदेवाडी, ता. हवेली, जि. पुणे) यास काही अज्ञात इसमांनी मारहाण करून जीव घेण्याच्या उद्देशाने चारचाकी वाहनातून अपहरण केल्याचे स्पष्ट झाले. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली लोणीकंद पोलीस ठाणे व गुन्हे शाखेची पाच स्वतंत्र पथके आरोपींच्या शोधासाठी रवाना करण्यात आली. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण व विविध दिशांनी तपास करत पोलिसांनी बीड, नांदेड व परभणी जिल्ह्यातील स्थानिक गुन्हे शाखेच्या मदतीने माजलगाव येथे धाड टाकली. या कारवाईत सात आरोपी व एका विधी संघर्षित बालकाला ताब्यात घेण्यात आले असून अपहरण झालेल्या निलेश बोद्रे यांची सुखरूप सुटका करण्यात आली. तपासादरम्यान महिला आरोपी सोनाली बालाजी निर्वाळ (वय २७, रा. भाग्यनगर, परभणी) हिने निलेश बोद्रे याच्याशी जबरदस्तीने लग्न करण्यासाठी इतर आरोपींसोबत संगनमत करून त्याचे अपहरण केल्याचे निष्पन्न झाले आहे.

या प्रकरणी लोणीकंद पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २०५/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १४०(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना अटक करून पोलीस कोठडी मिळविण्यात आली आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे पुढीलप्रमाणे आहेत. १. सुदाम मानिक ताठे (वय २३, रा. वजूर, ता. पूर्णा, जि. परभणी).२. शेख सोहेल शेख अफसर (वय २१, रा. वालूर, ता. सेलू, जि. परभणी). ३. देवीदास भगवान पांजगे (वय २१, रा. प्रसादनगर, परभणी). ४. वैभव मिलिंद शेळके (वय २२, रा. अनुसया टॉकीजजवळ, गंगाखेड रोड, परभणी) ५. सारंग भगवानराव काकडे (वय ३३, रा. आष्टूर, ता. लोहा, जि. नांदेड). ६. प्रसाद बंडू गवळी (वय २७, रा. प्रसादनगर, परभणी). ७. सोनाली बालाजी निर्वाळ (वय २७, रा. भाग्यनगर, परभणी). ही कारवाई पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलीस आयुक्त संजय दराडे, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, गुन्हे शाखेचे पोलीस उपआयुक्त गौहर हसन, परिमंडळ ५ च्या पोलीस उपआयुक्त राजलक्ष्मी शिवणकर, अतिरिक्त कार्यभार परिमंडळ ७ चे पोलीस उपआयुक्त श्री प्रशांत अमृतकर, सहाय्यक पोलीस आयुक्त श्रीमती नुतन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिता रोकडे, व पोलीस निरीक्षक मारुती पाटील (येवलेवाडी), पोलीस निरीक्षक नंदकुमार गायकवाड (वाघोली), व पोलीस निरीक्षक गडाख (चंदननगर), एलसीबी बीडचे शिवाजी बंटेवाड, पोलीस निरीक्षक स्वाती खेडकर, सहायक पोलिस निरीक्षक विजया वंजारी तसेच पोलीस उपनिरीक्षक अर्जुन बेंदगुडे, तुकाराम सुरवसे, मकाने आणि पोलीस अंमलदार स्वप्नील जाधव, कैलास साळुंके, सागर जगताप, रीतेश काळे, संतोष अंदुरे, मल्हारी सपुरे, शुभम चिनके, सुधीर शिवले, दिनेश मरकड, अशोक शेळके, तुषार पवार, प्रियांका पानसरे यांनी सहभाग घेतला.



## अहंकार आणि वाईट सवयींचा त्याग करावा - सपोनि प्रवीण संपांगे

**नारायणगाव (दै. संध्या)**

आज देशभरात ईद उल अजहा अर्थात बकरी ईद उत्साहात साजरी होत आ एनहे. या ईदचा उत्साह नारायणगाव मध्येही पहायला मिळाला. नारायणगाव येथील ईदगाह मैदान, सुन्नी जामे मस्जिद परिसरात नमाज पठणासाठी मुस्लिम बांधवांनी सकाळी गर्दी केली होती. नमाज पठणानंतर गळा भेट घेत बांधवांनी एकमेकांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी सपोनि प्रवीण संपांगे म्हणाले की, बकरी ईद निमित कुरबानी करत असताना नागरिकांनी अहंकार आणि वाईट सवयी यांचा त्याग करावा तसेच शासनाच्या नियमांचे पालन करून ईद साजरी करावी असे आवाहन करत मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. तर यावेळी सुन्नी मुस्लिम जमातचे अध्यक्ष एजाज आतार, विश्वस्त महेबुब काझी यांनी मुस्लिम बांधवांना प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करत सर्वांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. तसेच पोलीस बांधव आपले सुख दुःख विसरून समाजाच्या सुरक्षेसाठी सातत्याने काम करत आहे. तर ग्रामपंचायत नारायणगाव उपसरपंच बाबू पाटे यांचेही मोलाचे सहकार्य असल्याचे सांगत त्यांचे आभार मानत सन्मान यावेळी करण्यात आला. या निमित्ताने इदगाह मैदान येथे मौलाना मोहम्मद सज्जाद रजा तर सुन्नी जामा मस्जिद येथे हाफिज शेहबाज रजा यांच्या मार्गदर्शनाखाली नमाज अदा करण्यात आली.

# शेलपिंपळगाव येथे तेवीस किलो गांजासह तिघांना अटक

## बारा लाखांचा मुद्देमाल जप्त : अंमली पदार्थ विरोधी पथकाची कारवाई

**चाकण (दै. संध्या)**



अवैधरित्या गांजाची वाहतूक करणाऱ्या तीन सराईत गुन्हेगारांना अंमली पदार्थ विरोधी पथकाने रंगेहाथ पकडले. त्यांच्याकडून तब्बल २३ किलो ५३८ ग्रॅम वजनाचा गांजा, ३ मोबाईल आणि रोख रक्कम असा एकूण १२ लाख १० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चाकण - शिक्रापूर रस्त्यावरील शेलपिंपळगाव नजीक मोहितेवाडी हद्दीत गुरुवारी (दि.२८) दुपारी सव्वातीन वाजण्याच्या दरम्यान ही कारवाई करण्यात आली.

पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी शहर आणि परिसरात अंमली पदार्थांच्या अवैध विक्रीचे समूळ उच्चाटन करण्याचे आदेश गुन्हे शाखेला दिले आहेत. या आदेशानुसार अंमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी शहरात विशेष पेट्रोलिंगसाठी वेगवेगळी पथके तैनात केली होती. चाकण - शिक्रापूर रस्त्यावरील शेल पिंपळगाव नजीक मोहितेवाडी येथे गुरुवारी (दि.२८) दुपारी सव्वातीन वाजण्याच्या दरम्यान ही कारवाई करण्यात आली.

अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस अंमलदार निखिल वरपे व विजय दौंडकर हे चाकण दक्षिण पोलीस स्टेशनच्या हद्दीत गुरुवारी पेट्रोलिंग करत होते. त्यावेळी शिक्रापूर - चाकण हायवे रोडवर शेलपिंपळगाव, ( ता. खेड) येथील हॉटेल वैष्णवी समोर सार्वजनिक ठिकाणी तीन इसम संशया स्पदरीत्या थांबल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. पथकाने तात्काळ सापळा रचून तिघांना ताब्यात घेतले. त्यांची झडती घेतली असता, त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर गांजा मिळून आला.

संदिप भगवान हांडे (वय २८, रा. खराबवाडी, ता. खेड, मूळ रा. पिपरखेड, जि. छत्रपती संभाजीनगर), गणेश सुरेश तारु (वय ३०, रा. खराबवाडी, ता. खेड, मूळ रा. घोडगाव, ता. आंबेगाव) व रिहान वसिम शेख (वय १९, रा. खंडोबामाळ, चाकण, ता. खेड, जि. पुणे) यांना अटक करण्यात आली. याप्रकरणी तिन्ही आरोपींविरुद्ध चाकण दक्षिण पोलीस ठाण्यात एनडीपीएस ॲक्ट कलम ८ (क), २० (ब) (२) (क) आणि २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या आंतर जिल्हा अंमली पदार्थ तस्करीच्या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा हात आहे का, याचा पुढील तपास चाकण दक्षिण पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक राम सुकाळे करत आहेत.

पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, गुन्हे शाखेचे पोलीस उपआयुक्त प्रदिप जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त प्रविण मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश पाटील, सपोनि विक्रम गायकवाड, निखिल शेटे, विजय दौंडकर, सदानंद रुद्राक्षे, गोविंद डोके, निखिल वरपे, संतोष सपकाळ आणि चंद्रकांत जाधव यांच्या विशेष पथकाने ही कारवाई केली.

दरम्यान, पोलिसांच्या या धाडसी कामगिरीमुळे अंमली पदार्थ तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

## चाकणला प्रभाग क्रमांक अकरामध्ये अंतर्गत रस्त्यावर बसविले गतिरोधक

**चाकण (दै. संध्या)**



चाकण नगरपरिषदेच्या माध्यमातून प्रभाग क्रमांक अकरा मध्ये चाकण शहरात अंतर्गत रस्त्यावर शालेय विद्यार्थी, विद्यार्थिनी व ज्येष्ठ नागरिक यांचा मोठ्या प्रमाणात वावर असल्याने अपघात कधी होईल यांचा थांगपत्ता लागत नव्हता. त्या पार्श्वभूमीवर येथील नगरसेवक शशिकांत जाधव यांच्या प्रयत्नातून तातडीने गतिरोधक बसविण्यात आले आहेत.

चाकण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव यांच्या सहकार्याने व नगराध्यक्षा मनीषा गोरे आणि उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग क्रमांक अकराचे नगरसेवक शशिकांत जाधव, स्मिता जाधव यांनी यासाठी प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा केला होता. चाकण मधील अंगणवाडी, माणिक चौक या भागात गतिरोधक बसविण्याची नितांत गरज होती. या रस्त्यालगत संग्राम दुर्ग किल्ला, प्राथमिक शाळा, चक्रेश्वर मंदिर, दवाखाने, व्यवसायिकांची छोटी मोठी दुकाने, व्यापारी संकुल असल्याने नागरिकांची दिवसभर मोठी वर्दळ असते. या रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनांमुळे वारंवार अपघात होत होते.

ज्येष्ठ नागरिक, महिला व शालेय विद्यार्थ्यांना रस्ता ओलांडताना जीव मुठीत धरून जावे लागत होते. दररोज होत असलेले किरकोळ अपघात रोखण्यासाठी या प्रभागातील नगरसेवकांनी पुढाकार घेउन गतिरोधक बसविण्याचे काम पूर्ण करून घेतले. याप्रसंगी नगरसेवक शशिकांत जाधव, उद्योजक योगेश देशमुख, रमेश देशमुख, अशोक जाधव, मयूर भुरूक, अभिजीत जाधव, सुनील फुलवरे, राजेंद्र सुतार, मंदार देशमुख, मनोज जाधव, तेजस फुलवरे, गणेश सुतार, यश फुलवरे, ठेकेदार चेतन कौटकर, केदार देशमुख आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कांद्याला हमीभाव मिळण्यासाठी आंदोलन करू - विजयसिंह शिंदे

**चाकण (दै. संध्या)**

दिवसेंदिवस चाकण बाजारात कांद्याचे भाव कोसळत चालल्याने शेतकरी त्रस्त झाला असून, त्यांच्या कांद्याला योग्य भाव मिळावा, यासाठी आंदोलन करू, असा इशारा खेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विजयसिंह शिंदे यांनी दिला. चाकण बाजारात कांद्याची मोठ्या प्रमाणात आवक होत असताना भाव कोसळत चालले आहेत. कांद्याला हमीभाव मिळालाच पाहिजे, यासाठी शेतकऱ्यांनी चाकण बाजारात सभापती शिंदे यांच्याशी चर्चा केली. त्यावेळी शिंदे यांनी सांगितले की, पुणे जिल्ह्यात कांद्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात निघते. कांद्याला योग्य भाव मिळत नाही. कांदा लागवड करण्यापासून कांदा बाजार आणेपर्यंत मोठा खर्च होतो. शेतकऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे, अशी माझी भूमिका आहे. याप्रसंगी बाजार समितीचे सचिव बाळासाहेब धंदरे, सहाय्यक सचिव संतोष गायकवाड, संचालक माणिक गोरे, काँग्रेसचे चाकण शहर अध्यक्ष आनंद गायकवाड आदी उपस्थित होते. शिंदे यांनी सांगितले की, कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या हक्कासाठी प्रयत्नशील राहणार आहे.

कांदा खरेदीवर तातडीने तोडगा निघावा यासाठी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात अतिरिक्त जिल्हाधिकारी सतीश राऊत व पुणे प्रभारी जिल्हाधिकारी गजानन पाटील यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली आहे.

# कळंबूसरे येथील वादळी पावसातील नुकसान भरपाईच्या प्रतिक्षेत

## महसूल खात्याने नुकसानग्रस्तांचे पंचनामे शासनाच्या लालफितीच्या बासनात गुंडाळून ठेवल्याच्या तिखट प्रतिक्रिया



**उरण (दै. संध्या)**

उरण तालुक्यातील प्रामुख्याने कळंबुसरे गावात मागील वर्षी 26 मे 2025 रोजी सकाळी 6:00 वाजताचे सुमारास अचानक आलेल्या वादळी पावसामुळे कळंबूसरे गावासह चिरनेर, सारडे व वशेणी गावातील काही घरांचे असे तालुक्यातील 80 ते 85 नागरिकांच्या घरांच्या छपरांचे व जीवनावश्यक वस्तूंचे मोठे नुकसान झाले होते. त्यावेळी कोप्रोली मंडळ अधिकारी के.डी.मोहिते आणि तलाठ्यांनी घटनास्थळी जाऊन, गावातील नुकसानग्रस्त घरांचे तात्काळ पंचनामे करून, त्याचा अहवाल उरणचे तहसिलदार डॉ. उद्धव कदम यांच्या कार्यालयाकडे सुपूर्द केला होता. परंतु या घटनेला आठ महिने उलटून देखील अद्याप तालुक्यातील नागरिकांना तातडीची कोणतीही शासनाची मदत मिळालेली नाही. उरण तालुक्यातील कळंबुसरे या गावात सुमारे 80 ते 85 घरांच्या छापरांचे व घरातील जीवनावश्यक वस्तूंचे अचानक आलेल्या वादळी पावसात अतोनात नुकसान झाले होते. यामध्ये गतवर्षी सोमवारी 26 मे 2025 रोजी सकाळी अचानक आलेला पाऊस व सोसाट्याच्या वाऱ्यामुळे येथील नागरिकांच्या घरांचे छप्परच उडाले होते. तर काही घरांच्या भिंतींची पडझड झाली होती. तर काही घरांमध्ये पाणी घुसले होते. दरम्यान घराच्या संपूर्ण छपरा बरोबर घरातील विद्युत उपकरणे तसेच कपडे, बेड, सोपा अन्नधान्य जीवनावश्यक वस्तूंचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. पावसाने तालुक्यातील गावांना अक्षरश: झोडपून काढले होते. मात्र वादळी पावसातील घरांच्या घटनेला आज 12महिने उलटून गेले तरी अजून शासनाची नुकसान भरपाई मिळालेली नाही. लगेचच पावसाळा सुरु होणार असल्याने स्वतःच्या कुटुंबाचे रक्षणासाठी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत असलेल्या नागरिकांनी कर्ज काढून आणि अन्य स्वयंसेवी संस्थासह विविध माध्यमातून निधी उपलब्ध करून तीन - चार दिवसात आपापल्या घरांची वादळी पावसाच्या झटक्यात उडालेली छपरे कशीबशी बसवून घेतली.मात्र शासनाकडून करण्यात आलेले नुकसान भरपाईचे पंचनामे आज 12महिने होऊनही लालफितीच्या बसनात गुंडाळून ठेवले असल्याच्या प्रतिक्रिया नुकसान ग्रस्तांनमधून व्यक्त होत आहेत. त्यातच आत्ता पुन्हा एक महिन्यावर पावसाळा येऊन ठेपला असतांना देखील या गंभीर बाबीकडे गांभीर्याने लक्ष देण्यासाठी येथील स्थानिक लोकप्रतिनिधी धजावत नसल्याने वादळी पावसातील नुकसानग्रस्त नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

> उरणचे तहसिलदार यांनी नुकसानग्रस्तांना कोणत्याही प्रकारे तातडीची मदत न देता नुकसानग्रस्त घरांचे फक्त पंचनाम्यांचे आदेश होते. आत्ता तर नुकसानग्रस्तांच्या जखमेवर मिठ चोळल्यागत तहसील कार्यालयात नुकसानीच्या चौकशीसाठी गेल्यावर आश्वासनपेक्षा आजतगायत काहीही मिळालेलं नाही. त्यामुळे या नुकसान ग्रस्त शासकीय मदतीच्या प्रतीक्षेत आहेत.
> **- मनोज पाटील, नुकसानग्रस्त - कळंबूसरे, वादळी पाऊस 26 मे. 2025**

# जनगणना म्हणजे नव्या युगाची सुरुवात

**भारताची जनगणना ही केवळ लोकसंख्या मोजणी नसून देशाच्या लोकसंख्यात्मक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्वरूपाचे व्यापक चित्र सादर करणारी प्रक्रिया आहे. देशातील सर्वात मोठा प्रशासकीय उपक्रम म्हणून ओळख असलेल्या जनगणना गाव आणि शहर पातळीवरील सर्वात विश्वासार्ह माहितीचा स्रोत मानली जाते. पुराव्यावर आधारित शासनव्यवस्था, विकास नियोजन, कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी, शैक्षणिक संशोधन, व्यावसायिक धोरणे, तसेच मतदारसंघ पुनर्रचना आणि लोकप्रतिनिधित्व यांसारख्या लोकशाही प्रक्रियांसाठी ही माहिती अत्यंत महत्त्वाची ठरते. जनगणनेद्वारे उपलब्ध होणाऱ्या माहितीमुळे शासन आणि विविध संस्था लोकसंख्येतील बदल समजून घेऊन नागरिकांच्या गरजांनुसार धोरणे आखू शकतात.**

भारताने १८७२ पासून अखंड जनगणनेची परंपरा जपली आहे, त्यामुळे जगातील काही मोजक्या देशांमध्ये भारताला विशेष ऐतिहासिक स्थान प्राप्त झाले आहे. कोविड-१९ महामारीमुळे २०२१ ची जनगणना पुढे ढकलण्यात आल्यानंतर आता जनगणना २०२७ ही देशाची एकूण सोळावी आणि स्वातंत्र्यानंतरची आठवी जनगणना ठरणार आहे. भारतात जनगणना "डी फॅक्टो कॅनव्हासर पद्धतीने" केली जाते. या पद्धतीत नियुक्त प्रगणक ठराविक कालावधीत प्रत्येक घराला भेट देऊन नागरिकांकडून थेट माहिती संकलित करतात. काळानुसार भारतातील जनगणना प्रक्रियेची कार्यपद्धती देशाच्या विशाल लोकसंख्या, भौगोलिक विविधता आणि प्रशासकीय गरजांनुसार विकसित होत गेली आहे. पूर्वी १९३१ पर्यंत एका रात्रीत एकाच वेळी जनगणना करण्याची पद्धत वापरली जात होती. मात्र, व्यावहारिक आणि व्यवस्थापकीय अडचणींमुळे ती बंद करण्यात आली. त्यानंतर टप्प्याटप्प्याने घरगुती माहिती संकलनाची सध्याची पद्धत स्वीकारण्यात आली. दुर्गम, कठीण आणि हिमवृष्टीग्रस्त भागांमध्येही प्रत्येक व्यक्तीची नोंद व्हावी यासाठी विशेष व्यवस्था केली जाते, ज्यामुळे जनगणना प्रक्रिया सर्वसमावेशक, व्यापक आणि संपूर्ण देशाचे प्रतिनिधित्व करणारी ठरते.

**आधीच्या जनगणनांपेक्षा आताची जनगणना वेगळी का?**

भारत जनगणना २०२७ द्वारे एक ऐतिहासिक टप्पा गाठणार आहे, कारण ही देशातील पहिली पूर्णपणे डिजिटल जनगणना असेल. पारंपरिक कागदी पद्धतीऐवजी पहिल्या टप्प्यातील घरयादी व घरगणना (HLO) साठी माहिती "Census 2027-HLO" या विशेष मोबाईल अॅपद्वारे संकलित केली जाणार आहे.

हे मोबाईल अॅप सोपे, सोयीस्कर आणि वापरण्यास सुलभ अशा पद्धतीने डिझाइन करण्यात आले आहे, जेणेकरून सर्व प्रगणक आणि पर्यवेक्षक सहजपणे त्याचा वापर करू शकतील. या अॅपमुळे मोठमोठे कागदी फॉर्म बाळगण्याची गरज राहणार नाही, तसेच कार्यपत्रके, संक्षिप्त अहवाल आणि इतर पुनरावृत्ती होणारे कागदी काम कमी होऊन क्षेत्रीय कर्मचाऱ्यांचा वेळ आणि श्रम वाचणार आहेत.

जनगणना २०२७ मधील आणखी एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे "स्व-गणना" (Self-Enumeration) पद्धत. प्रथमच नागरिकांना अधिकृत वेब पोर्टल https://se.census.gov.in द्वारे स्वतःच्या घराची आणि कुटुंबाची माहिती सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. महाराष्ट्रासह देशभरातील दिवसभर कामानिमित्त घराबाहेर असणाऱ्या नागरिकांसाठी ही सुविधा विशेषतः उपयुक्त ठरणार आहे. ठराविक कालावधीत एखाद्या कुटुंबाने स्व-गणना पूर्ण केली नाही तर प्रगणक प्रत्यक्ष भेट देऊन पुन्हा माहिती संकलित करतील.

सुरळीत अंमलबजावणी आणि रिअल-टाइम निरीक्षण सुनिश्चित करण्यासाठी, जनगणना २०२७ चे जनगणना व्यवस्थापन आणि देखरेख प्रणाली (CMMS) द्वारे परीक्षण केले जाईल. या डिजिटल प्रणालीमुळे विविध स्तरांवरील जनगणना अधिकारी क्षेत्रीय कामकाजाची प्रगती, माहिती संकलनाची गुणवत्ता आणि व्याप्ती यावर रिअल-टाइम देखरेख ठेवू शकतील.

मोबाईल अॅप, स्व-गणना पोर्टल आणि CMMS यांच्या माध्यमातून जनगणना २०२७ अधिक वेगवान, अचूक आणि कमी कष्टदायक होण्याची अपेक्षा आहे. यामुळे डिजिटल प्रशासनाच्या नव्या युगाची पायाभरणी होणार आहे.

**जनगणनेची कायदेशीर चौकट**

भारताची जनगणना ही जनगणना अधिनियम १९४८ च्या तरतुदींनुसार आयोजित केली जाणारी जगातील सर्वात मोठी आणि सर्वात विश्वासार्ह प्रशासकीय प्रक्रिया म्हणून ओळखली जाते, हा कायदा देशभरातील गणनेसाठी वैधानिक आधार प्रदान करत आहे.

भारताची जनगणना ही जगातील सर्वात मोठ्या आणि विश्वासार्ह प्रशासकीय उपक्रमांपैकी एक मानली जाते. ती "जनगणना अधिनियम १९४८" अंतर्गत राबवली जाते. या अधिनियमाच्या कलम ३ नुसार केंद्र सरकार अधिकृत राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून जनगणना घेण्याचा निर्णय जाहीर करू शकते. त्यानुसार भारत सरकारने १६ जून २०२५ रोजी जनगणना २०२७ ची अधिसूचना प्रसिद्ध केली. ही प्रक्रिया सहकारी संघराज्यवादाच्या तत्त्वावर आधारित असून राज्य सरकारे, स्थानिक स्वराज्य संस्था आणि जिल्हा प्रशासन यांचे पूर्ण सहकार्य आवश्यक असते. या कायद्यात सार्वजनिक सहभाग आणि कायदेशीर जबाबदारी यांना विशेष महत्त्व देण्यात आले आहे. कलम ८ नुसार प्रत्येक नागरिकाने अधिकृत जनगणना अधिकाऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची माहिती आपल्या माहिती आणि विश्वासानुसार अचूकपणे देणे बंधनकारक आहे. राष्ट्रीय आकडेवारीची अचूकता ही नागरिकांच्या प्रामाणिक सहकार्यावर अवलंबून असल्याचे या तरतुदीत अधोरेखित करण्यात आले आहे, तसेच कलम ९ अंतर्गत जनगणना अधिकाऱ्यांना आवश्यकतेनुसार घर किंवा परिसरात प्रवेश करण्याचा, तसेच जनगणनेकरिता ओळख चिन्हे अथवा क्रमांक लावण्याचा अधिकार देण्यात आला आहे. इतक्या मोठ्या उपक्रमासाठी आवश्यक संरक्षणात्मक तरतुदीदेखील कायद्यात करण्यात आल्या आहेत. कलम ११ नुसार प्रश्नांची उत्तरे देण्यास जाणीवपूर्वक नकार देणे, चुकीची माहिती देणे, जनगणना अधिकाऱ्यांच्या कामात अडथळा निर्माण करणे किंवा जनगणनेच्या खुणांमध्ये छेडछाड करणे यासाठी दंडाची तरतूद आहे. या तरतुदींचा उद्देश केवळ शिक्षा करणे नसून माहिती संकलनाची शुद्धता आणि पूर्णता सुनिश्चित करणे हा आहे. जनगणनेवरील जनतेचा विश्वास टिकवून ठेवण्यासाठी माहितीची गोपनीयता अत्यंत महत्त्वाची आहे. जनगणनेवरील जनतेचा विश्वास वैयक्तिक माहितीचा गैरवापर होणार नाही किंवा उघडकीस आणला जाणार नाही या आश्वासनावर अवलंबून आहे. कलम १५ अंतर्गत जनगणनेतील वैयक्तिक माहितीची तपासणी किंवा ती दिवाणी अथवा फौजदारी प्रकरणांमध्ये पुरावा म्हणून वापरण्यास मनाई करण्यात आली आहे, अपवाद फक्त जनगणना कायद्यांतर्गत गुन्ह्यांच्या प्रकरणांपुरता आहे. म्हणूनच जनगणनेत गोळा केलेली माहिती केवळ सांख्यिकीय उद्देशांसाठी वापरली जाईल आणि ती कायदा अंमलबजावणी संस्था, न्यायालये किंवा प्रशासकीय यंत्रणांना वैयक्तिक कारवाईसाठी उपलब्ध करून दिली जाणार नाही.

जनगणना अधिनियमांतर्गत तयार करण्यात आलेल्या "जनगणना नियम १९९०" मध्ये घरयादी, लोकसंख्या मोजणी, पर्यवेक्षण आणि माहिती हाताळणीसंदर्भातील सविस्तर प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे देशभरात जनगणना प्रक्रिया एकसमान पद्धतीने राबवली जाते. जनगणना २०२७ ही केवळ सांख्यिकीय मोहीम नसून, एक घटनात्मक आणि प्रशासकीय उपक्रम आहे, जो पुराव्यावर आधारित शासनव्यवस्थेप्रती राज्याच्या बांधिलकीचे प्रतीक आहे. या प्रक्रियेची कायदेशीर चौकट राज्यसत्ता, नागरिकांची जबाबदारी आणि वैयक्तिक गोपनीयतेचे संरक्षण यामधील समतोल राखण्याचा प्रयत्न करते. भारतासारख्या विशाल आणि विविधतेने नटलेल्या देशात जनगणना विश्वासार्ह, सर्वसमावेशक आणि राष्ट्रीय प्रतिनिधित्व करणारी राहण्यासाठी अशी चौकट अत्यावश्यक आहे.




## यशवंत को-ऑपरेटिव्ह बँकेचा परवाना रद्द; चरेगावकर बंधूंच्या मालमत्तांचा लिलाव करण्याची ठेवीदारांची मागणी

सातारा- फलटण येथील यशवंत को-ऑपरेटिव्ह बँकेवर आता अखेरची मोठी कारवाई झाली आहे. रिझर्व बँक ऑफ इंडियानं यशवंत बँकेचा परवाना रद्द करत मंगळवारी सायंकाळपासून (19 मे) बँकेचे सर्व व्यवहार थांबवले आहेत. आरबीआयच्या आदेशानुसार ग्राहकांना आता या बँकेत कोणतेही आर्थिक व्यवहार करता येणार नाहीत. या कारवाईनं सहकार क्षेत्रात खळबळ उडाली आहे. भाजपा नेते तथा सहकार परिषदेचे माजी अध्यक्ष शेखर चरेगावकर यांना मोठा झटका बसला आहे.




यशवंत बँकेची आर्थिक स्थिती अत्यंत खालावल्यामुळे ग्राहकांच्या सुरक्षेसाठी हे कडक पाऊल उचलणं आरबीआयला भाग पडलं आहे. बँकेकडे सध्या व्यवसाय चालवण्यासाठी पुरेसे भांडवल आणि भविष्यात कमाईची कोणतीही शाश्वत चिन्हे उरलेली नसल्याचंही आरबीआयने म्हटलं आहे. बँकेची सद्यस्थिती पाहता, ही बँक आपल्या ग्राहकांच्या ठेवी पूर्णपणे परत करण्यास असमर्थ असल्याचे आरबीआयनं स्पष्टपणे नमूद केलं आहे. बँकिंग क्षेत्रातील सुरक्षितता आणि स्थिरता टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अनेक महत्त्वाच्या नियामक अटी आणि शर्तींचं पालन करण्यात बँक व्यवस्थापन अपयशी ठरली असल्याचा ठपका आरबीआयनं ठेवला आहे. तसेच बँकेचे कामकाज पुढे सुरू ठेवणे ठेवीदारांच्या आणि सार्वजनिक हिताच्या दृष्टीने पूर्णपणे घातक ठरेल, असा निष्कर्षही काढला आहे.

बँकेचा परवाना रद्द करून यशवंत को-ऑपरेटिव्ह बँकेला नवीन ठेवी स्वीकारणं किंवा जुन्या ठेवींचे वाटप करणं यासह सर्व प्रकारच्या बँकिंग कामकाजावर पूर्णपणे बंदी घातली आहे. बँक गुंडाळण्याची प्रक्रिया सुरू करण्याचे आणि त्यावर तातडीने 'लिक्विडेटर' नियुक्त करण्याचे निर्देशही आरबीआयने महाराष्ट्राचे सहकार आयुक्त आणि सहकारी संस्थांच्या निबंधकांना दिले आहेत. हा लिक्विडेटर बँकेच्या सर्व मालमत्तेचा ताबा घेईल. तसेच कर्जवसुली करून मिळालेल्या पैशांतून देणी चुकती करेल.

यशवंत बँकेच्या उपलब्ध आकडेवारीनुसार बँकेतील तब्बल 99.02% ठेवीदार हे 5 लाख किंवा त्यापेक्षा कमी ठेव असणारे आहेत. त्यामुळे डीआयसीजीसीच्या नियमांनुसार या सर्व ग्राहकांना त्यांचे संपूर्ण पैसे परत मिळतील. आरबीआयने दिलेल्या माहितीनुसार, या प्रक्रियेला आधीच गती देण्यात आली असून ठेवीदारांच्या संमतीनुसार 20 एप्रिल 2026 पर्यंत 'डीआयसीजीसी'नं 106.96 कोटी रुपयांचे विमा वाटप पूर्ण केलं आहे.


> यशवंत बँकेचे लायसन्स रद्द करून आरबीआयनं चांगली कारवाई केली आहे. अवसायक नियुक्त करण्याचा आदेशही दिला आहे. २०२० नंतर ज्या कर्जांचे वाटप झाले आहे, ते कुणी सामान्य कर्जदार नाहीत. ते पैसे पैसे चरेगावकरांनी स्थापन केलेल्या बोगस ८० ते ८२ संस्थांकडे वळविले गेलले आहेत. त्यामुळे आता लवकरात लवकर बँकेचे तत्कालीन अध्यक्ष आणि घोटाळ्याचा गुन्हा दाखल झालेल्या चरेगावकर बंधूंच्या मालमत्तांचा लिलाव केला करून पैसे वसुली केली पाहिजे.
>
> **- ठेवीदारांचे वकील अॅड. नीलेश जाधव**

भाजपाच्या राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी यांनी यशवंत बँकेतील गैरव्यवहाराबद्दल आरबीआयकडं तक्रार केलेली होती. त्या अनुषंगाने बँकेच्या तीन शाखांवर ईडीनं डिसेंबर 2025 मध्ये छापे टाकून भाजपा नेते आणि सहकार परिषदेचे माजी अध्यक्ष शेखर चरेगावकर यांच्यासह भावाला ईडीनं अटक केली आहे.

तत्पूर्वी यशवंत को-ऑपरेटिव्ह बँकेतील 112 कोटी 10 लाख 57 हजार 481 रुपयांच्या गैरव्यवहार प्रकरणी बँकेचे तत्कालीन अध्यक्ष शेखर चरेगावकर यांच्यासह 50 जणांवर कराड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. लेखापरीक्षण पूर्व कालावधीत संचालकांवर अपहाराचा ठपका ठेवण्यात आला आहे.

## भारतासाठी महागाईचे धक्के अपरिहार्य

**उच्च व्याजदरांचा वापर 'अंतिम उपाय' म्हणून केला जाऊ शकतो : अलेक्झांड्रा हरमन प्रसाद**



भारत महागाईच्या संकटातून सुटू शकत नाही आणि त्याचे परिणाम आता दिसू लागले आहेत, असं ऑक्सफर्ड इकॉनॉमिक्सच्या पश्चिम आशिया संशोधन विभागाच्या प्रमुख अलेक्झांड्रा हरमन प्रसाद यांनी म्हटलं आहे. तसंच त्यांनी पुढं असंही सूचित केलं की, या वर्षाच्या अखेरपर्यंत महागाईची पातळी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या (आरबीआय) अंदाजापेक्षा जास्त होण्याची शक्यता आहे. "तेलाच्या किमतींसारखे घटक थेट दिसत असले तरी, त्यांचा अप्रत्यक्ष परिणाम खूप मोठा आहे. व्यावसायिक ग्राहक आधीच इंधनाच्या वाढलेल्या किमती आणि पुरवठ्यावरील दबावाचा सामना करत आहेत," असं त्यांनी स्पष्ट केलं. जागतिक घडामोडींच्या पार्श्वभूमीवर ऑक्सफर्ड इकॉनॉमिक्सनं भारतातील महागाईवर एक अभ्यास करून अहवाल प्रसिद्ध केला. या अभ्यासाचं नेतृत्व करणाऱ्या अलेक्झांड्रा हरमन प्रसाद यांची "ईनाडू-ईटीव्ही भारत"चे विशेष प्रतिनिधी एम. एल. नरसिंह रेड्डी यांनी मुलाखत घेतली. यावेळी अलेक्झांड्रा हरमन प्रसाद यांना विविध प्रश्न विचारण्यात आले. यावेळी त्या काय म्हणाल्या, ते जाणून घ्या?

इंधनाच्या वाढत्या किमतींच्या धक्क्यापासून ग्राहकांना आतापर्यंत काही प्रमाणात संरक्षण मिळालं असलं तरी, हे संरक्षण फार काळ टिकेल असं आपण गृहीत धरू शकत नाही. इंधनाच्या किमतींमध्ये केवळ 10 टक्के वाढ झाली तरी, पुढील तीन ते चार महिन्यांत मुख्य चलनवाढ 0.3 ते 0.4 टक्क्यांनी वाढू शकतं. या वर्षाच्या शेवटच्या काही महिन्यांत महागाईचा परिणाम अधिक तीव्रतेनं जाणवण्याची शक्यता आहे. आमच्या अंदाजानुसार, 2026 च्या चौथ्या तिमाहीत मूळ महागाई दर 6.4 टक्के असेल, जो आरबीआयच्या अंदाजापेक्षा खूप जास्त आहे. अन्नधान्याची महागाईसुद्धा वाढत आहे. गेल्या वर्षाच्या अखेरीपासून कुटुंबांना महागाईचं परिणाम जाणवू लागलं आहेत. मात्र, या वर्षाच्या मध्यापासून विशेषतः तिसऱ्या आणि चौथ्या तिमाहीत, हा परिणाम अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. सुरुवातीचा परिणाम डिझेल आणि पेट्रोलच्या किमतींमध्ये दिसून आला, परंतु येत्या काही दिवसांत तो सर्व क्षेत्रांमध्ये पसरण्याची शक्यता आहे. उद्योग, उत्पादन, रेस्टॉरंट्स आणि हॉटेल व हॉस्पिटॅलिटी क्षेत्रांना सर्वाधिक फटका बसण्याची शक्यता आहे. खाद्यपदार्थांच्या किमती वाढतील आणि येत्या काही महिन्यांत वाहतूक क्षेत्रावरील परिणाम अधिक ठळकपणे दिसून येईल. वस्तू पुरवठा आणि कृषी यांसारख्या क्षेत्रांवरही परिणाम होईल. खतांच्या बाबतीत बोलायचं झाल्यास, त्याचा तात्काळ परिणाम शेतकऱ्यांवर नाही, तर सरकारवर होईल. एक मोठा प्रश्न असा आहे की, मान्सून सुरू होऊन खरीप पेरणीचा हंगाम सुरू होईपर्यंत शेतकऱ्यांना पुरेशी खतं उपलब्ध होतील का? जून महिना भात आणि मका यांसारख्या पिकांसाठी महत्त्वाचा असतो. खतांचा अतिरिक्त पुरवठा सुनिश्चित करण्यात आखाती देश महत्त्वाची भूमिका बजावतात. या समस्येची तीव्रता लक्षात घेता, भारताच्या पंतप्रधानांनी खतांचा वापर कमी करण्याचं आवाहन केलं आहे. यामुळं पुरवठ्यात विलंब, वितरणात व्यत्यय आणि मागणीची कमतरता निर्माण होऊ शकते. वार्षिक सरासरी महागाईचा दर तुलनेनं कमी वाटत असला तरी, तो पुढील काही महिने वाढलेला राहण्याची शक्यता आहे. रिझर्व्ह बँकेनं अलीकडेच दुसऱ्या टप्प्याशी संबंधित परिणाम मान्य केलं आहेत. आतापर्यंत, बँक हळूहळू आपल्या महागाईच्या अंदाजांमध्ये सुधारणा करत होती. ग्राहक किंमत निर्देशांकावर (CPI) आधारित महागाईचा दर आर्थिक वर्ष 2026-27 मध्ये सरासरी 4.6 टक्के आणि कॅलेंडर वर्ष 2026 मध्ये 4.2 टक्के राहण्याचा अंदाज आहे. जागतिक तेलाच्या किमती 10 टक्क्यांपर्यंत वाढू शकतात. तसंच महागाई 0.2 टक्के किंवा त्याहून अधिक वाढू शकते, असा अंदाज लावला होता. मात्र, आमच्या अंदाजानुसार, आर्थिक वर्ष 2026-27 मध्ये महागाईचा सरासरी दर 5.9 टक्के आणि कॅलेंडर वर्ष 2026 मध्ये 5.1 टक्के असेल. महागाई आणि व्याजदराच्या अंदाजांबाबत बोलायचं झाल्यास, सध्याची मागणीची परिस्थिती एक मोठं आव्हान उभे करते. 2026 च्या सुरुवातीला उपभोगात जोरदार वाढ झाली असली तरी, आमच्या नवीन अभ्यासानुसार तो मुळातच कमकुवत राहिला आहे. कॅलेंडर वर्षाच्या पहिल्या तिमाहीच्या अखेरीस, ग्राहक खर्चात माफक घट झाल्याची चिन्हे दिसत आहेत. परिणामी, कंपन्यांना आता त्यांच्या वाढलेल्या कच्च्या मालाच्या किमती ग्राहकांवर लादण्याची संधी कमी मिळाली आहे. यामुळं आर्थिक अडचणी निर्माण होऊ शकतात. महागाई वाढतच राहणार असल्यामुळं त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आरबीआयकडे मर्यादित पर्याय असल्याचं दिसतं. दरम्यान, रुपयाचंही सातत्यानं अवमूल्यन होत आहे. या परिस्थितीवर उपाय म्हणून, आरबीआयला अखेरचा उपाय म्हणून व्याजदर वाढवण्याचा मार्ग अवलंबावा लागू शकतो. 2022 मध्ये जेव्हा व्याजदरवाढ सुरू झाली, तेव्हा परकीय चलन साठ्यातील घट हे एकमेव कारण नव्हतं. मात्र, जागतिक आर्थिक परिस्थितीमुळं, हा साठा केवळ सहा महिन्यांत 37 अब्ज डॉलर्सनं कमी झाला. परिणामी, व्याजदर वाढवणं आवश्यक झालं. सप्टेंबर 2025 पर्यंत परकीय चलन साठ्यात 27 अब्ज डॉलर्सची घट होण्याचा अंदाज आहे. विशेष म्हणजे, याच कालावधीत, मार्च 2026 पर्यंत भविष्यातील देयता 100 अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त वाढण्याचा अंदाज आहे. ही परिस्थिती पाहता, आरबीआय या वर्षाच्या अखेरपर्यंत प्रमुख व्याजदरांमध्ये प्रत्येकी 25 बेसिस पॉइंट्सची दोनदा वाढ करू शकते. एका हेतुपुरस्सर धोरणात्मक निर्णयानुसार, सरकारनं वाढत्या खर्चाचा भार ग्राहकांवर टाकण्याऐवजी तो स्वतः उचलण्याचा निर्णय घेतला. ग्राहक किंमत निर्देशांकामध्ये (CPI) इंधनाचा वाटा अंदाजे एक दशांश (एक तृतीयांश) असतो.



### सोने-चांदी आणखी महागणार!

देशातून परदेशात जाणारा पैसा कमी करण्यासाठी आणि रुपयाची घसरण रोखण्यासाठी केंद्र सरकारने सोने आणि चांदीवरील आयात शुल्कात मोठी वाढ केलीय. सरकारने सोने आणि चांदीवरील आयात शुल्क 6 टक्क्यांवरून थेट 15 टक्क्यांपर्यंत वाढवलं असून, हा निर्णय मंगळवार मध्यरात्रीपासून लागू करण्यात आलाय. नव्या रचनेनुसार सरकारने 10 टक्के बेसिक कस्टम ड्युटी आणि 5 टक्के AIDC (ऍग्रीकलचर इन्फ्रास्ट्रक्टर अँड डेव्हलपमेंट सेस) लागू केला आहे. त्यामुळे परदेशातून सोने-चांदी आणणे आता अधिक महाग होणार आहे, याचा थेट परिणाम देशातील सराफा बाजारावर होण्याची शक्यता आहे. सोने खरेदीसाठी ग्राहकांना अधिक पैसे मोजावे लागतील. गुंतवणुकीसाठी घेतले जाणारे गोल्ड बारही महाग होण्याची शक्यता : महाराष्ट्र सुवर्णकार संघटनेचे अध्यक्ष निर्भयसिंह राजपूत सांगतात की, भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक सोने वापरणारा देश आहे. देशातील मोठी मागणी परदेशातून येणाऱ्या सोन्यावर अवलंबून असल्याने शुल्कवाढीचा परिणाम तात्काळ दिसू शकतो. दागिने, सोन्याची नाणी आणि गुंतवणुकीसाठी घेतले जाणारे गोल्ड बारही महाग होण्याची शक्यता आहे. भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक सोने वापरणारा देश मानला जातो.



## सप्टेंबरपर्यंत साखरेच्या निर्यातीवर बंदी

केंद्र सरकारने तात्काळ प्रभावाने 30 सप्टेंबर 2026 पर्यंत किंवा पुढील आदेश येईपर्यंत साखरेच्या निर्यातीवर बंदी घातलीय. साखरेच्या उत्पादनात घट होण्याची शक्यता लक्षात घेता देशांतर्गत किमती नियंत्रणात ठेवण्याच्या आणि स्थानिक पातळीवर साखरेची पुरेशी उपलब्धता सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने सरकारने हे पाऊल उचललंय. परकीय व्यापार महासंचालनालयाने (DGFT) जारी केलेल्या अधिसूचनेत सरकारने साखरेच्या निर्यात धोरणात बदल केला आहे. ITC (HS) कोड 1701 14 90 आणि 1701 99 90 अंतर्गत येणाऱ्या साखरेची निर्यात श्रेणी 'प्रतिबंधित' (Restricted) वरून बदलून 'निषिद्ध' (Prohibited) करण्यात आलीय. या आदेशाच्या कक्षेत कच्ची साखर (Raw sugar), पांढरी साखर (White sugar) आणि शुद्ध साखर (Refined sugar) या सर्वांच्या निर्यातीचा समावेश होतो. विशिष्ट निर्यातींना सूट : या अधिसूचनेत असे नमूद करण्यात आले आहे की, ही बंदी 30 सप्टेंबरपर्यंत किंवा या बंदीचा कालावधी पुढे वाढवला जाईपर्यंत लागू राहील. जर या बंदीचा कालावधी वाढवला गेला नाही, तर साखरेचे निर्यात धोरण पुन्हा 'प्रतिबंधित' (Restricted) श्रेणीमध्ये परत येईल. सरकारने हे स्पष्ट केले आहे की, CXL आणि TRQ कोट्यांतर्गत युरोपियन युनियन (EU) आणि अमेरिकेला (USA) केली जाणारी साखरेची निर्यात या बंदीच्या कक्षेत येणार नाही; म्हणजेच अशा निर्यातींना यातून वगळण्यात आलंय.

काही साखरेच्या खेपांना निर्यात सुरू ठेवण्याची परवानगी : याव्यतिरिक्त 'अग्रिम प्राधिकार योजने' (Advance Authorization Scheme - AAS) अंतर्गत केली जाणारी निर्यात, तसेच अन्न सुरक्षेच्या उद्देशाने 'सरकार ते सरकार' (G2G) पातळीवर पाठवल्या जाणाऱ्या साखरेच्या खेपांना निर्यात सुरू ठेवण्याची परवानगी असेल. अधिसूचनेत पुढे असेही नमूद करण्यात आले आहे की, ज्या साखरेच्या खेपांची निर्यात प्रक्रिया आधीच सुरू झाली आहे, त्यांना काही विशिष्ट अटींच्या अधीन राहून निर्यात पूर्ण करण्याची परवानगी दिली जाणार आहे.

देशांतर्गत किमती नियंत्रणात ठेवण्यासाठी निर्णय : शिवाय जर साखरेची जहाजावर चढवण्याची (लोडिंगची) प्रक्रिया अधिसूचनेच्या तारखेपूर्वीच सुरू झाली असेल किंवा 'शिपिंग बिल' आधीच दाखल करण्यात आले असेल आणि साखरेचे जहाज (Vessel) हा आदेश लागू होण्यापूर्वीच एखाद्या भारतीय बंदरावर दाखल झाले असेल किंवा नांगर टाकून उभे असेल, तर अशा खेपांची निर्यात प्रक्रिया पुढे सुरू ठेवता येईल. ज्या प्रकरणांमध्ये साखरेच्या खेपा अधिसूचनेच्या प्रकाशनापूर्वीच सीमाशुल्क अधिकाऱ्यांच्या (Customs authorities) किंवा संबंधित रक्षकांच्या (Custodians) ताब्यात देण्यात आल्या होत्या, अशा प्रकरणांमध्येही निर्यातीला परवानगी दिली जाणार आहे. हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की, या सरकारी निर्णयामागील मुख्य उद्देश देशांतर्गत साखरेच्या किमती नियंत्रणात ठेवणे हा आहे; कारण साखरेचे उत्पादन करणाऱ्या प्रमुख प्रदेशांमध्ये उसाच्या उत्पादनात घट झाल्यामुळे सलग दुसऱ्या वर्षी साखरेचे उत्पादन हे देशांतर्गत मागणीच्या (वापराच्या) तुलनेत कमी राहण्याची शक्यता आहे. 'एल निनो'च्या (El Niño) स्थितीमुळे आगामी मान्सूनमध्ये व्यत्यय येऊ शकतो, अशी भीतीही व्यक्त केली जात आहे; ज्यामुळे पुढील हंगामातील उत्पादनाबाबतच्या चिंतांमध्येही वाढ झाली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### जेजुरी नव्याने विकसित झालेल्या बाल उद्यानात चिमुकल्यांची मोठी गर्दी

जेजुरी (दैनिक संध्या) : तीर्थक्षेत्र जेजुरी नगरीत नव्याने विकसित झालेल्या राजमाता अहिल्यादेवी होळकर बाल उद्यानात विविध खेळणी वर खेळण्यासाठी बाल चिमुकल्यांची मोठी गर्दी होत आहे. कुलदैवत खंडोबा देवाच्या जेजुरी गडाच्या पायथ्याशी तसेच ऐतिहासिक होळकर तलाव काठावर आणि श्री स्वामी समर्थ मठ परिसरात जेजुरी नगरपरिषदेच्या वतीने जेजुरीच्या ऐतिहासिक तलावाकाठी राजमाता अहिल्यादेवी होळकर उद्यान आणि ओपन जीम नव्याने विकसित करण्यात आली आहे. या उद्यानात लहान मुलांसाठी विविध खेळणी तसेच महिलांसाठी ओपन जीम साहित्य बसविण्यात आले आहे. सायंकाळी या उद्यानात खेळण्यासाठी मोठ्या संख्येने बाल चिमुकली मुले, तसेच त्यांच्या बरोबर पालक मोठ्या संख्येने गर्दी करीत आहेत. विविध खेळणी असल्याने लहान मुलांचा आनंद ओसंडून वाहत असल्याचे चित्र पाहण्यास मिळत आहे. तसेच महिलांसाठी ओपन जीम आणि चालण्यासाठी ट्रॅक तयार करण्यात आल्याने सायंकाळी महिला वर्ग या ठिकाणी व्यायामासाठी येत असतात. या उद्यानाशेजारी श्री स्वामी समर्थ मठ, तसेच ग्रामदेवता जानाई देवी मंदिर, आणि ऐतिहासिक तलाव असल्याने देवदर्शन आणि पर्यटनाचा लाभ नागरिक घेत आहेत. या उद्यानात अहिल्या सृष्टी उभारण्यात येणार असून या अहिल्या सृष्टीचे काम अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे. हे काम पूर्ण झाल्यास येथे पर्यटन विकसित होणार आहे.

### आळंदी-चऱ्होली डॉक्टर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी डॉ. ज्योत्स्ना आवारी बिनविरोध



आळंदी (दैनिक संध्या) : आळंदी-चऱ्होली डॉक्टर्स असोसिएशनची नूतन कार्यकारिणी नुकतीच सर्वसंमतीने बिनविरोध निवडण्यात आली. अध्यक्षपदी डॉ.ज्योत्स्ना आवारी, सचिवपदी डॉ. सचिन सुदडे, उपाध्यक्षपदी डॉ. निखिल सोनवणे तर खजिनदारपदी डॉ. रवींद्र बदरखे यांची निवड करण्यात आली. यावेळी माजी पदाधिकाऱ्यांनी नूतन कार्यकारिणीचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. नव्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांनी संघटनेच्या माध्यमातून डॉक्टर्समधील समन्वय अधिक दृढ करण्याबरोबरच सामाजिक बांधिलकी जपत विविध आरोग्यविषयक उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. डॉ. ज्योत्स्ना आवारी अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर म्हणाल्या, "आळंदी-चऱ्होली परिसरातील सर्व डॉक्टरांचा विश्वास आणि सहकार्य हीच आमची खरी ताकद आहे. असोसिएशनच्या माध्यमातून वैद्यकीय क्षेत्रातील सहकार्य, संवाद आणि सेवाभाव अधिक मजबूत करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांपर्यंत दर्जेदार आरोग्य सेवा पोहोचविण्यासाठी विविध आरोग्य शिबिरे, जनजागृती मोहिमा आणि सामाजिक उपक्रम राबविण्यावर भर दिला जाईल. तसेच युवा डॉक्टरांना व्यासपीठ उपलब्ध करून देत सर्व सदस्यांना एकत्र घेऊन संघटनेची वाटचाल अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न राहील."

### टेडएक्स- डीवायपीडब्ल्यूएस युथ कार्यक्रमात अदिती पोहनकर करणार मार्गदर्शन

पिंपरी (दैनिक संध्या) : आकुर्डी येथील डी. वाय. पाटील एज्युकेशन अँड रिसर्च फाउंडेशन आणि सिम्प्लिफाय सक्सेस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या टेडएक्स -डी वाय पी डब्ल्यू एस युथ-२०२६ कार्यक्रमात अभिनेत्री आदिती पोहनकर तरुणांना मार्गदर्शन करणार आहे. हा कार्यक्रम दि. ३१ मे रोजी स. १० वा, आकुर्डी येथील डी वाय पाटील शैक्षणिक संकलातील शांताई सभागृहात होणार आहे. याप्रसंगी डी. वाय पाटील प्रतिष्ठानचे विश्वस्त तेजस पाटील, गायिका अन्वेशी जैन, चित्रपट निर्माते दिग्दर्शक अनंत महादेवन, बालाजी जयसीलन, दीपक वाणी , कर्नल मिकी ओबेरॉय , जुही दामोदर , मणी कंदन एम.एस, डॉ. अमित सुरतकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहे.अशी माहिती डॉ डी वाय पाटील वर्ल्डस स्कुलचे अध्यक्ष डॉ.भरत पाटील यांनी दिली.

### दादोजी कोंडदेव-गडकरींचा पुतळा पुन्हा बसवा : सकल ब्राह्मण समाजाची मागणी

पुणे (दैनिक संध्या) : पुण्यातल्या लाल महालातून दादोजी कोंडदेव यांचा पुतळा हटविण्यात आला होता, तर छत्रपती संभाजी उद्यानातून राम गणेश गडकरी यांचा पुतळा हटविण्यात आला होता. गेले अनेक वर्षे हे पुतळे बंद खोलीत ठेवण्यात आले आहेत. त्यांचे पुतळे सन्मानाने शहरात बसविण्यात यावेत, अशी मागणी सकल ब्राह्मण समाजाने महापौर मंजूषा नागपुरे यांच्याकडे केली आहे. तर हे दोन्ही पुतळे लाल महाल व संभाजी उद्यानात बसविण्यास शिवसंग्रामसह शिव-शंभूभक्त संघटनांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. लाल महलात दादोजी कोंडदेव यांच्या पुतळ्याला विरोध झाल्याने तो पुतळा हटवून पु. ल. देशपांडे उद्यानातील एका खोलीत ठेवण्यात आला आहे. तर संभाजी महाराज यांची नाटकातून बदनामी केल्याने राम गणेश गडकरी यांचा पुतळा उखडून नदीत फेकून देण्यात आला होता.

## बिबट्याचा धुमाकूळ; प्रशासनाला जाग कधी येणार?

**कोरेगावमुळ (दै. संध्या)**

कोरेगाव मूळ व परिसरामध्ये बिबट्याने अक्षरशः उच्छाद मांडला असून, पाळीव प्राण्यांवर हल्ले करण्याचे सत्र सुरूच ठेवले आहे. शुक्रवारी (ता. 29) पहाटेच्या सुमारास भिडे वस्ती - कड वस्ती परिसरात एका शेतकऱ्याच्या घरासमोरून बिबट्याने वासरू उचलून नेल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात प्रचंड घबराट पसरली असून, वनखात्याच्या संथ आणि ढिसाळ कारभाराविरोधात शेतकऱ्यांमधून संतापाचा उद्रेक होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कोरेगाव मूळ येथील भिडे वस्ती - कड वस्ती परिसरातील रहिवासी चिंतामणी उर्फ बाबा भिडे यांच्या घरासमोर पाळीव जनावरे बांधलेली होती. शुक्रवारी पहाटे पाऊणे तीन वाजण्याच्या सुमारास दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक हल्ला करत भिडे यांचे वासरू जबड्यात पकडून ओढत नेले. बिबट्या त्या वासराला जवळच्याच शेतात घेऊन गेल्याची दाट शक्यता आहे. बिबट्याने वासरू शेतात नेऊन फस्त केले असण्याची शक्यता असल्याने, तो याच परिसरात रेंगाळण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे जवळच्या शेतकऱ्यांनी आणि शेतमजुरांनी पुढील दोन दिवस शेतात जाणे टाळावे. वनखाते फक्त चौकशी अन् पंचनामाच करणार का? या परिसरात बिबट्याचा हा पहिलाच हल्ला नाही. यापूर्वी बिबट्याने वेगवेगळ्या शेतकऱ्यांच्या तब्बल 3 कालवडी मारून फस्त केल्या आहेत. प्रत्येक वेळी घटना घडल्यानंतर वनविभागाचे अधिकारी केवळ चौकशी करतात, घटनास्थळी येऊन पंचनामा करतात आणि निघून जातात, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिक देत आहेत. वनखाते फक्त पंचनामे करण्यासाठीच आहे का? बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा का लावला जात नाही? एखादा मानवी बळी गेल्यावर वनविभागाला जाग येणार का? असेच दिवसेंदिवस चालू राहणार का? असा संतप्त सवाल आता कोरेगाव मूळ आणि उरुळी कांचन परिसरातील शेतकरी विचारू लागले आहेत.

## आयुर्वेदामध्ये व्याधींचे मूळ शोधण्याची क्षमता

### प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांचे प्रतिपादन; रसायू लाईफ सायन्सेसतर्फे संशोधनपर ग्रंथाचे प्रकाशन

**पुणे (दै. संध्या)**

"आयुर्वेद हा प्राचीन भारतीय वैद्यकीय ज्ञानवारसा असून, आयुर्वेदामध्ये व्याधींचे मूळ शोधण्याची क्षमता आहे. आधुनिक काळात आयुर्वेदाचा अधिकाधिक प्रसार व प्रचार होण्याची आवश्यकता आहे. संशोधन व तंत्रज्ञानाच्या अंतर्भावाने आयुर्वेद अधिक समृद्ध होईल," असे प्रतिपादन संसदीय समितीच्या अध्यक्षा व राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी केले.

जगभरातील नावाजलेल्या शास्त्रीय नियतकालिकांमध्ये प्रकाशित झालेल्या रसायू लाईफ सायन्सेसच्या आयुर्वेदाशी संबंधित शोधनिबंधांची माहिती देणाऱ्या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. कर्वेनगर येथील रसायू लाईफ सायन्सेसच्या नवीन वास्तूमध्ये झालेल्या समारंभावेळी ज्येष्ठ उद्योजक विजय काळे आणि रसायू लाइफ सायन्सेसचे



डॉ. योगेश बेंडाळे व डॉ. विनीता बेंडाळे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमाळकर, माजी विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी, उद्योजक धन्यकुमार चोरडिया, डॉ. शर्मिला मांडे आदी उपस्थित होते. प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, "आयुर्वेद उपचारांचा उत्तम अनुभव मी स्वतः घेतला आहे. केंद्र सरकारकडून नेमलेल्या आरोग्यविषयक समितीची जबाबदारी नुकतीच माझ्याकडे सोपविण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर, आयुर्वेदविषयक संशोधनाची दिशा, माहिती संकलन, केस स्टडीज तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर आयुर्वेदाचे महत्त्व, प्रसार अशा मुद्यांचा विचार प्रामुख्याने सुरू आहे. डॉ. बेंडाळे यांनी सातत्याने आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर भारतीय आयुर्वेदाचे महत्त्व आणि शास्त्रीय संशोधनाचे सादरीकरण केले आहे. समिती या संशोधनाची माहिती घेऊन, तसेच सर्व आरोग्यतज्ज्ञांशी विचारविनिमय करून व्यापक हितकारी असे काम करेल." विश्वास काळे म्हणाले, "आयुर्वेदशास्त्राशी तडजोड न करता आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून डॉ. बेंडाळे आणि त्यांचे सहकारी आयुर्वेदातील संशोधनाचे सादरीकरण करत आहेत, हे महत्त्वाचे आहे. केवळ परंपरेच्या आधारे कोणतेही दावे न करता, फक्त तथ्यांवर आधारित संशोधनप्रणाली त्यांनी अंगिकारली आहे."

डॉ. योगेश बेंडाळे यांनी दृकश्राव्य सादरीकरणाच्या माध्यमातून मनोगत मांडले. गेल्या ३० वर्षांपासून कोणताही सरकारी निधी न घेता रसायू लाईफ सायन्सेस स्वयंप्रेरणेने संशोधनकार्य करत आहे. संस्थेकडे ४५ आंतरराष्ट्रीय पेटंट्स आहेत, कर्करोगावरील संशोधनाला अमेरिका, युरोपीय देश, जपान आदि प्रगत देशांमधील मानांकित शास्त्रीय नियतकालिकांमध्ये स्वीकारले गेले आहे.

संस्थेने ४५० हून अधिक शासनमान्य औषधे विकसित केली आहेत. माझ्यासह तज्ज्ञ सहकाऱ्यांनी १०० पेक्षा अधिक आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर आयुर्वेदाचे सादरीकरण केले आहे. लाखो रुग्णांवरील यशस्वी उपचारांचा अनुभव संस्थेकडे आहे.

## स्वा. सावरकर हे थोर देशभक्त आणि असीम त्यागमूर्ती

### लेखक व अभ्यासक प्रा. डॉ. श्रीरंग कंदलगावकर; स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंती निमित्त अभिवादन

**पुणे (दै. संध्या)**

थोर देशभक्त, असीम आणि पराकोटीचा त्याग केलेले व्यक्तिमत्व आणि ब्रिटिशांविरोधात झुंजणाऱ्या स्वा. सावरकरांचे नाव आपण आदराने घेतो. त्यांच्याविषयीचे वाचन महत्वाचे आहे. असीम त्यागाचे व्रत, त्यांचे स्मरण हे आपले कर्तव्य आहे, असे मत लेखक व अभ्यासक प्रा.डॉ.श्रीरंग कंदलगावकर यांनी व्यक्त केले.

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंती निमित्त ग्राहक पेठेतर्फे सावरकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी कार्यकारी संचालक सूर्यकांत पाठक यांच्यासह



ग्राहक पेठेचा सर्व सेवकवर्ग आणि नागरिक उपस्थित होते.

प्रा.डॉ.श्रीरंग कंदलगावकर म्हणाले, ज्यांनी अंदमानचे वास्तव्य पाहिले आहे, ते कोणाही स्वातंत्र्य सैनिका बद्दल उलटेसुलटे बोलणार नाही. विदेशी कपड्याची होळी सावरकरांनी पुण्यात केली. त्यांचे एकतरी पुस्तक आपण वाचावे. आपल्या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास आपण वाचावा.

सूर्यकांत पाठक म्हणाले, आज आपण सावरकर जयंती साजरी करत आहोत, पण खरा सन्मान तेव्हाच होईल जेव्हा आपण त्यांच्या विचारांतील राष्ट्रप्रेम आपल्या आचरणात आणू. देशासाठी प्रामाणिकपणे काम करणे, समाजातील अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे, स्वत:च्या कर्तव्याचे प्रामाणिक पालन करणे, हीच खरी सावरकरांना आदरांजली ठरेल. आजही सावरकरांचे विचार लाखो तरुणांच्या मनात राष्ट्रभक्तीची ज्योत पेटवत आहेत, असेही त्यांनी सांगितले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उदय जोशी यांनी केले. आभार भीमाशंकर मेरू यांनी मानले.

## कात्रज तलावात माशांचा मृत्यू; परिसरात दुर्गंधी

**पुणे (दै. संध्या)**

कात्रज येथील ऐतिहासिक तलावामध्ये गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर मासे मृत अवस्थेत आढळून येत आहेत. तलावाच्या काठावर आणि पाण्यावर अनेक मृत मासे तरंगताना दिसत असून, त्यामुळे परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली आहे. या प्रकारामुळे स्थानिक नागरिकांसह सकाळ-सायंकाळ फेरफटका मारण्यासाठी येणाऱ्या नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. तलाव परिसरात पडलेल्या मृत माशांवर ताव मारण्यासाठी कावळे आणि भटके श्वान मोठ्या संख्येने जमा होत आहेत. काही अर्धवट खाल्लेले मासे तलावाच्या किनाऱ्यावर आणि परिसरात विखुरलेले दिसत असल्याने दुर्गंधीत आणखी भर पडत आहे. परिणामी परिसरात माश्या आणि डासांचे प्रमाण वाढले असून, डेंग्यू, मलेरिया यांसारख्या साथीच्या रोगांचा धोका वाढण्याची भीती आहे. तलावातील माशांचा मृत्यू नेमका कोणत्या कारणामुळे होत आहे, याचे अधिकृत कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, परिसरातील सांडपाणी किंवा रासायनिक मैला प्रक्रिया न करता थेट तलावात सोडला जात असल्यामुळे पाण्याचे प्रदूषण वाढले असावे, असा प्राथमिक अंदाज पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## जुन्नर तालुक्यातील डॉक्टर लावणार ५५० झाडे

**नारायणगाव (दै. संध्या)**

जुन्नर तालुका मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन ने पर्यावरणाच्या संवर्धनासाठी "एक डॉक्टर – एक वृक्ष" हे अतिशय स्तुत्य अभियान हाती घेतले असून, या मोहिमेअंतर्गत मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण केले जाणार आहे. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने गणपीर बाबाच्या डोंगरावर व परिसरात तब्बल 550 झाडांचे वृक्षारोपण करण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी लागणारी झाडे खरेदी करण्यासाठी असोसिएशनच्या वतीने नारायणगाव ग्रामपंचायतचे उपसरपंच योगेश पाटे यांच्याकडे धनादेश सुपूर्त करण्यात आला. वाढते प्रदूषण रोखणे आणि पर्यावरणाविषयी समाजात जनजागृती करणे हा या मोहिमेचा मुख्य हेतू आहे. हे अभियान असोसिएशनच्या सन २०२६-२०२७ च्या नवीन कार्यकारिणीच्या अध्यक्ष डॉ. प्रशांत काचळे यांच्या नेतृत्वाखाली राबवले जात आहे. वृक्ष लागवडीत चिंच ,बेल ,जांभूळ, अर्जुन ,मोहगणी, पिंपळ, आवळा ,वड ,वॉटर पल यांसारखी देशी झाडे लावली जाणार आहेत. वृक्षारोपणानंतर झाडांच्या संगोपनाची जबाबदारी नारायणगाव ग्रामपंचायतीने स्वीकारली असून पावसाळ्याच्या सुरुवातीला झाडांची लागवड केली जाणार आहे. असोसिएशनच्या अधिकृत कार्यातून आणि उपक्रमांतून नागरिकांना आरोग्य सेवा देण्यासोबतच सामाजिक बांधीवकीही उत्तमरीत्या जपली जात आहे. यावेळी असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. प्रशांत काचळे ,सचिव डॉ.प्रवीण शिंदे, चेअरमन जेटीएमपीए ट्रस्ट डॉ. प्रदीप जोशी, डॉ.संदीप काकडे, डॉ. धीरज तोडकर, डॉ. माधुरी पाटील, डॉ. सारिका फुलवडे, डॉ. महादेव वाणी, डॉ. केतकी काजळे, डॉ. मयूर पांचाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

## बारामती बसस्थानक राज्यात प्रथम; १ कोटींचे पारितोषिक

### उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केले आगारातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन

**पुणे (दै. संध्या)**

"हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियानात बारामती बसस्थानकाने "अ" वर्गामध्ये ९७ गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावून १ कोटी रुपयांचे पारितोषिक मिळाले आहे. याबद्दल राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आगारातील चालक, वाहक, यांत्रिक, प्रशासकीय व पर्यवेक्षकीय कर्मचाऱ्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल अभिनंदन केले आहे.

राज्य परिवहन महामंडळात प्रवाशांना स्वच्छ, सुंदर बसस्थानके उपलब्ध व्हावीत व प्रवाशांना दर्जेदार सुविधा उपलब्ध होण्याच्या हेतूने या अभियानाची २३ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत महामंडळातील सर्व बसस्थानकावर अभियान राबविण्यात येत आहे. हे



अभियान स्पर्धात्मक असून उत्कृष्ट बसस्थनाकांना रोख रक्कम देवून गौरविण्यात येते. बसस्थानकाच्या कामगिरीवर आधारित सर्वेक्षण करण्यात आले असून त्यामध्ये बारामती बसस्थानकाला प्रथक क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे " स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियानाअंतर्गत प्रत्येक स्तरावरील तपासणी समित्यांनी त्यांना नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रातील बसस्थानकाची तपासणी कधी व किती कालावधीत केली याची नोंद बसस्थानकाच्या स्वच्छता अभियान नोंदवहीत करण्यात येते. तपासणी समितीच्या प्रत्येक सदस्याने काटेकोर तपासणी करुन मूल्यांकन निःपक्षपातीपणे करण्याच्या सूचना दिल्या जातात. प्रत्येक स्तरावरील समितीने दिलेला निर्णय हा अंतिम असतो.

प्रत्येक स्तरावरील तपासणी समितीने त्यांना नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रामध्ये तपासणीअंती गुणपत्रिका तयार करुन त्यावर सदस्यांची स्वाक्षरी केली जाते. जर दोन किंवा त्यापेक्षा जास्त बसस्थानकांना समसमान गुण प्राप्त झाले तर अशा वेळी ज्या बसस्थानकावरील बस फेऱ्यांची संख्या जास्त असेल त्या बसस्थानकाला वरचा क्रमांक देण्यात येतो. नव्या स्वच्छता अभियानामध्ये मागील स्वच्छता अभियानामध्ये केलेल्या कामगिरीची योग्य दखल घेतली घेण्यात येते. परंतु, नव्या संकल्पना किंवा इतर नावीन्यपूर्ण योजना (ज्या पुर्वी वापरलेल्या नाहीत) या अभियानामध्ये अपेक्षित असल्यामुळे त्या संकल्पना व नावीन्यपूर्ण योजनांचा गुण क्रमांक देण्यासाठी विचार करण्यात येतो.

## हसण्यातूनच वाढेल माणसाचा 'हॅप्पीनेस इंडेक्स' : मकरंद टिल्लू

### 'आयसीएमएआय'च्या ६७ व्या वर्धापनदिनानिमित्त पहिल्यांदाच कौटुंबिक स्नेहमेळाव्याचे आयोजन'

**पुणे (दै. संध्या)**

दी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या (आयसीएमएआय) ६७ व्या वर्धापनदिनानिमित्त पुणे चॅप्टरच्या वतीने पहिल्यांदाच कौटुंबिक स्नेहमेळाव्याचे आयोजन केले होते. मुलांसाठी स्केचिंग, टॅटू, फोटोसेशन, तसेच सीएमए व्यवसायाविषयी कुटुंबियांच्या भावना मांडणारे पॉडकास्ट अशा विविध मनोरंजनात्मक उपक्रमांचे व संवाद सत्रांचे आयोजन केले होते. सीएमए हे केवळ प्रोफेशन नाही, तर एक कुटुंब आहे, या भावनेतून जवळपास २०० पेक्षा अधिक लोक मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते.



कर्वेनगर येथील सीएमए भवन येथे झालेल्या या कार्यक्रमावेळी 'आयसीएमएआय'चे राष्ट्रीय उपाध्यक्ष सीएमए नीरज जोशी, माजी अध्यक्ष सीएमए धनंजय जोशी, सीएमए डॉ. संजय भार्गवे, आयसीएमएआय पुणे चॅप्टरचे अध्यक्ष सीएमए श्रीकांत इप्पलपल्ली, उपाध्यक्ष सीएमए राहुल चिंचोळकर, सचिव सीएमए हिमांशू दवे, सीएमए अमेय टिकले यांच्यासह सीएमए सदस्य, त्यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमात हास्ययोग प्रशिक्षक व प्रेरक वक्ते मकरंद टिल्लू यांचे 'हसण्यासाठी जगा, जगण्यासाठी हसा' या विषयावर व्याख्यान झाले. मकरंद टिल्लू म्हणाले, "आजच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्येकाने आनंदी राहणे आणि इतरांनाही आनंद देणे आवश्यक आहे. हसण्याचे मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर सकारात्मक परिणाम होतात. नियमित हास्यामुळे तणाव कमी होतो, मन प्रसन्न राहते आणि आरोग्य अधिक सुदृढ बनते. जीवनात आनंदी राहण्यासाठी 'हॅप्पीनेस इंडेक्स' वाढवायला हवा, त्यासाठी मनमुराद हसायला हवे." आपल्या खुमासदार शैलीत दैनंदिन जीवनातील ताणतणाव, नातेसंबंध आणि आनंदी जीवनशैली यांवर त्यांनी भाष्य केले.

सीएमए नीरज जोशी म्हणाले, आज 'आयसीएमएआय' यशाच्या शिखरावर पोहोचली आहे. मात्र, त्यामागे अनेक वर्षांची सातत्यपूर्ण मेहनत, समर्पण आणि एकजुटीची ताकद आहे. सीएमए होण्याकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत असून, लाखो लोक परीक्षेला बसताहेत, ही समाधानाची बाब असल्याचे ते म्हणाले.

सीएमए डॉ. संजय भार्गवे म्हणाले, 'आयसीएमए' ही केवळ एक संस्था नसून, एक कुटुंब आहे. येथे प्रत्येक सदस्य एकमेकांशी व्यावसायिक नात्यासह भावनिक बंध, आपुलकी आणि परस्पर सहकार्याच्या नात्यानेही जोडला आहे. प्रत्येक उपक्रमामध्ये सदस्यांचा सहभाग, एकमेकांप्रती सन्मान आणि संकटकाळात मिळणारी साथ हीच 'आयसीएमएआय'ची खरी ताकद आहे.

सीएमए धनंजय जोशी यांनी 'आयसीएमएआय' पुणे चॅप्टरच्या या उपक्रमाचे कौतुक केले. पुण्याने दिलेले 'सीएमए इज मोर दॅन प्रोफेशन... इट्स अ फॅमिली' हे घोषवाक्य देशभर घेऊन जावे, असे आवाहन त्यांनी केले. गेल्या साठ वर्षात पुणे शाखेने उत्तम प्रगती करीत व्यवसायाबरोबरच कौटुंबिक स्नेह जपण्यात घेतलेला पुढाकार आनंद देणारा आहे.

सीएमए श्रीकांत इप्पलपल्ली यांनी स्वागत-प्रास्ताविकात सीएमए सदस्यांसोबतच त्यांच्या कुटुंबियांना या आनंदात सहभागी करून घेण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजिल्याचे सांगितले. सीएमए अमेय टिकले यांनी सूत्रसंचालन केले. सीएमए राहुल चिंचोळकर यांनी आभार मानले. केक कापून संस्थेचा वर्धापनदिन साजरा करण्यात आला.

